




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक २८९ * नांदेड * गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## शेतकरी कर्जमाफीसाठी बच्चू कडूंचे आक्रमक आंदोलन

### राजू शेट्टी, रविकांत तुपकर यांच्यासह अनेकांचा सहभाग



**नागपूर (प्रतिनिधी)–** प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी ठिय्या आंदोलन सुरु केलं आहे. बच्चू कडू यांच्याकडून कर्जमाफीच्या मागणीसाठी महाएल्गार आंदोलन सुरु करण्यात आलं होतं. आंदोलन २८ तारखेपासून सुरु झाल्यानंतर आज आंदोलनाचा दुसरा दिवस आहे. ठिय्या आंदोलनामुळं होणाऱ्या प्रवाशांच्या गैरसोईची मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठानं सुमोटो दखल घेतली आहे. बच्चू कडू यांनी बुधवारी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत स्वतःला आणि स्वतःच्या आंदोलन सहकाऱ्यांसह ठिय्या आंदोलन सुरू असलेल्या स्थळावरून बाजूला व्हावे असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहे.

बच्चू कडू यांना आंदोलनासाठी २८ ऑक्टोबर साठीची आणि तीही परसोडी गावाजवळच्या मैदानावरील आंदोलनाची परवानगी देण्यात आली होती.ती परवानगी २८ तारखेसाठी होती. मात्र, ठिय्या आंदोलन आज म्हणजे २९ तारखेला ही सुरू आहे आणि त्यामुळे लोकांना खास करून रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना त्रास होत आहे. परिसरात अनेक रुग्णालये सुद्धा आहेत. अनेक रुग्णांना त्रासाचा सामना करावा लागला आहे, असे सुद्धा नागपूर खंडपीठाच्या आदेशात म्हणण्यात आले आहे. आदेशात १ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलनासंदर्भात जी याचिका स्वीकारली होती त्याचा उल्लेखही करण्यात आला आहे. **(पान ६ वर...)**

## युद्ध पुन्हा पेटले! इस्रायलच्या हवाई हल्ल्यात १०४ पॅलेस्टिनी नागरिक ठार

**गाझा (वृत्तसंस्था)–** गाझा पट्टीमध्ये रात्री झालेल्या हवाई हल्ल्यांमध्ये किमान १०४ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे, त्यात ४६ मुले आणि २० महिला आहेत. या हल्ल्यांमध्ये २५० पेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत. हा हल्ला रफाहमध्ये कथित शस्त्रसंधी उल्लंघनाच्या प्रत्युत्तरात करण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे, तर हमासने या आरोपांचे खंडन करत इस्रायलने शस्त्रसंधी करार मोडल्याचा आरोप केला आहे.

इस्रायलच्या लष्करानुसार, हमासच्या अतिरेक्यांनी त्यांच्या सैन्यावर टँकविरोधी क्षेपणास्त्र आणि स्नायपर च्या सहाय्याने हल्ला केला. या हल्ल्यात एक इस्रायली सैनिक ठार झाला. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हल्ल्यास प्रत्यत्तर देत गाझा ओलांडून कठोर हल्ल्यांचे आदेश दिले. यानंतर आयडीएफने काही तासांतच ३० हमास कमांडर्स ठार झाल्याचे वृत्त समोर आले.

मिळलेल्या माहितीनुसार, हमास मृत इस्रायली सैनिकाचा मृतदेह परत करण्यास तयार होते, परंतु इस्रायली हल्ल्यांमुळे हे हस्तांतरण पुढे ढकलण्यात आले. या घटनेनंतर हमासने मध्यस्थांना इस्रायलवर युद्धबंदीचे पालन करण्यासाठी दबाव आणण्याचे आवाहन केले आहे. हा युद्धबंदी करार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मध्यस्थीत झाला होता, परंतु या नव्या संघर्षामुळे कराराची नाजूकता पुन्हा उघड झाली आहे. हल्ल्यांमुळे गाझा पट्टीतील नागरिकांच्या सुरक्षेवर गंभीर परिणाम होत असून, मानवीय संकट अधिक गंभीर झाले आहे.

### आ. राजेश पवार यांच्या आंदोलनाचा दणका

## घरकुल लाभार्थ्यांकडून लाच घेणारे नऊ ग्रामीण अभियंते पदावरून कार्यमुक्त

### सीईओ मेघना कावली यांची धाडसी कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव पंचायत समितीअंतर्गत तालुक्यातील काही घरकुल लाभार्थ्यांकडून लाच स्वीकारल्याची कबुली दिलेल्या नऊ ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना त्या पदावरून तात्काळ कार्यमुक्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केली असून आ. राजेश पवार यांनी केलेल्या आंदोलनानंतर कारवाईचा हा बडगा उगारण्यात आला आहे.

नायगाव मतदारसंघाचे आ. राजेश पवार यांनी नायगाव तहसील कार्यालयात आणि पंचायत समितीमध्ये दि. २७ ऑक्टोबर रोजी अचानक भेट दिली होती. यावेळी अनेक लेटलतीफ कर्मचाऱ्यांना त्यांनी खडे बोल सुनावत त्यांच्या खुर्चीना शाल- पुष्पहार घालून गांधीगिरी केली होती. त्यानंतर पंचायत समितीमध्ये गेल्यानंतर हाच प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. तेथेही प्रचंड अनागोंदीचा कारभार पाहून आ. राजेश पवार चांगलेच संतापले होते. त्यानंतर तिथे आलेल्या काही घरकुल लाभार्थ्यांची विचारपूस केली असता त्यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना पैसे देऊनही काम होत नाहीत असे सांगितले. यावेळी स्वतः संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना आ. पवार यांनी फैलावर घेतले असता या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घरकुल लाभार्थ्यांकडून आम्ही लाच घेतल्याची कबुली दिली.

या गंभीर प्रकरणाची दखल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी घेतली आणि दि. २९ ऑक्टोबर रोजी पंचायत समिती नायगाव अंतर्गत कार्यरत असलेले ग्रामीण गृहनिर्माण अभियंता अर्जुन प्रभाकरराव जाधव, शेख समीर, ओमप्रकाश विश्वनाथ पांडागळे, सुजित शिवराम दाताळकर, धोंडीबा मारुती उपासे, आडे संतोष किशन, ऋषिकेश नामदेव सरोदे, मोहम्मद इब्राहिम आणि संतोष माधवराव वडजे यांना तडकाफडकी त्या पदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे.

## 'आर.एस.एस.' विरोधी सोशल मीडिया पोस्टवरून वाद

### पाच आरोपींविरुद्ध अॅट्रॉसिटीचा गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** उमरी तालुक्यात एका अॅट्रॉसिटी प्रकरणाबाबत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी पोलिसांना सांगितल्यानंतर रात्री उशिरा उमरी पोलीस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार पोलीस ठाणे उमरीच्या हद्दीत राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या एका १७ वर्षीय युवकाला दि. २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास त्याच्या मोबाईलवर फोन आला. त्यात फोन करणारा सांगत होता की, मी स्वप्नील लाड उर्फ राजपूत बोलतो. तुला एका मुलीबद्दल बोलायचे आहे. तेव्हा गावाशेजारी असलेल्या तलावाजवळ ये. तेव्हा तो युवक आपले भाऊ संघर्ष बळीराम लांडगे, प्रशांत संभाजी लांडगे आणि गौरव बळी लांडगे असे सर्व मिळून तलावाजवळ गेले. त्यावेळी दुपारचे ३.३० वाजले होते. तेव्हा तेथील उपस्थितीत युवकांपैकी स्वप्नील लाड त्या युवकाजवळ आला आणि त्याची इंस्टाग्राम आयडी दाखवून तू यावर आरएसएस मुर्दाबादची पोस्ट टाकलेली आहेस, असे म्हणत त्याची स्क्रिनशॉट दाखवली आणि मारहाण करण्यास सुरूवात केली. यावेळी त्याने जातीवाचक शिवीगाळ करून अशी पोस्ट का ठेवलीस म्हणून दम दिला. त्यानंतर आपल्या कंबरेला असलेल्या **(पान ६ वर...)**

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा नांदेड दौरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरूवार ३० ऑक्टोबर २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी बेलोरा विमानतळ जि. अमरावती येथून विमानाने सायंकाळी ५.३० वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन. सायं.५.३५ वा. मोटारीने उदगीरकडे प्रयाण. उदयगिरी औद्योगिक वसाहत लोणी नांदेड रोड उदगीर जिल्हा लातूर येथून रात्री ११.२५ वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन. रात्री ११.३० वा. विमानाने आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणेकडे प्रयाण करतील.

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ माजी आ. शंकरअण्णांच्या घरी!



**नांदेड –** काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी महाराष्ट्र राज्य समितीचे एमआरएस संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते माजी आ. शंकरअण्णा धोंडगे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, जिल्हा अध्यक्ष माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महाराष्ट्र ओबीसी प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे, समन्वयक एकनाथ मोरे, बालाजी चव्हाण यांच्यासह दत्ता पवार, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष दिलीप धोंडगे, शिवराज पाटील धोडगे, दिगंबर पाटील दांडेगावकर, सरपंच भास्करराव पुयड, विष्णुकांत पाटील कल्याणकर, मन्मत कल्याणकर, शिवराज पाटील पवार, शाहीर गौतमराव पवार, तथागत कांबळे, दीपक कळणे आदींची उपस्थिती होती.

## आंध्र प्रदेशात १०० किमी वेगाने धडकले 'मोंथा' चक्रीवादळ

**अमरावती (प्रतिनिधी)–** 'मोंथा' चक्रीवादळ आंध्र प्रदेशच्या किनाऱ्याला धडकून ओडिशाच्या दिशेने सरकले असून, त्यामुळे १५ जिल्ह्यांतील जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळामुळे एका महिलेला जीव गमवावा लागला असून, २ जण जखमी झाले आहेत. हवामान खात्याच्या माहितीनुसार हे वादळ हळूहळू कमजोर होत आहे. राज्य सरकारने प्रभावित भागांत अलर्ट जारी केला असून, आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## भारत ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला टी २० सामना पावसामुळे रद्द

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला टी-२० सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श यांनी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. सामना सुरुवातीपासूनच पावसाच्या व्यत्ययामुळे प्रभावित झाला आणि त्यामुळे दोन्ही डाव १८ षटकांपर्यंत मर्यादित करण्यात आला. पण, सामन्यादरम्यान पुन्हा एकदा १०व्या षटकात पावसाने व्यत्यय आणला आणि शेवटी पंचांनी सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी भारतीय संघ फलंदाजी करत होता. सूर्यकुमार यादव आणि शुभमन गिल क्रीजवर होते. भारताने ९.४ षटकांत ९७ धावांवर १ गडी गमावला होता. आता मेलबर्नमध्ये दुसरा सामना ३१ नोव्हेंबर रोजी खेळला जाईल.

## शिक्षणातील आरक्षण खाजगीकरणामुळे तर नोकरीतील आरक्षण हे कंत्राटीकरणाच्या माध्यमातून संपविले

- अॅड. प्रकाश आंबेडकर यांची टीका
- ओबीसींनी निर्णायक भूमिका घेण्याचे आवाहन





**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** सरकारने शिक्षणातील आरक्षण खाजगीकरणामुळे तर नोकरीतील आरक्षण हे कंत्राटीकरणाच्या माध्यमातून संपविले आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी केली. तसेच आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ओबीसींनी निर्णायक भूमिका घेण्याचेही आवाहन त्यांनी केले. ते बुधवार दि. २९ आक्टोबर रोजी नांदेडमध्ये भटके, विमुक्त, बलुतेदार ओबीसी एल्गार महामोर्चात बोलत होते. यावेळी ओबीसीचे नेते लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

शहरातील नवा मोंढा मैदानाहून निघालेल्या महामोर्चाचे रूपांतर जिल्हाधिकारी कार्यालयावर सभेत झाले. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांनी आता देशात आणि राज्यात शैक्षणिक आणि नोकऱ्यातील आरक्षण संपविण्यात आल्याची टीका केली. आता राहिलेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका यामधील आरक्षणावरही फडणवीस सरकारनेच गदा आणली आहे. ओबीसींनी सरकारचाच हा डाव ओळखावा आणि स्वतःचे आरक्षण वाचवण्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भूमिकेत निवडणुकीत निर्णायक भूमिका घ्यावी असे आवाहन केले. आता जर ओबीसींनी भूमिका घेतली नाही, तर त्यांचे राजकीय आरक्षण हिरावले जाईल, असे मत अॅड. आंबेडकर यांनी व्यक्त केले.









## पोलीस व महसूल प्रशासनाकडून रेती घाटांवर कारवाई; जवळपास दीड कोटींचा मुद्देमाल जप्त

### एलसीबीचे पीआय खंडेराय पथकासह घाटावर; ११ इंजिन, ९२ तराफे, ३० ब्रास रेती असा एकूण ८० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कल्हाळ, भनगी, पिंपळगाव, वाहेगाव, मार्कंड याठिकाणी एलसीबीच्या पथकाने कारवाई करत अवैध रेती उपसा करणाऱ्या साहित्यासह ३० ब्रास रेती जप्त केली आहे. या कारवाईत जवळपास ८० लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २८ ऑक्टोबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय हे आपल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह जिल्ह्यातील कल्हाळ, भनगी, पिंपळगाव, वाहेगाव, मार्कंड येथील गोदावरी नदी घाटावर पोहचले. सदर ठिकाणी विनापरवाना बेकायदेशिररित्या शासनाचा महसूल चुकवून एकुण ११ इंजिन व एकूण ९२ तराफ्यांच्या सहाय्याने गोदावरी नदी पात्रातून रेतीचा उपसा करून एकूण ३० ब्रास रेतीचा साठा केलेला मिळून आला. या प्रकरणी १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवि वाहुळे, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, नागनाथ तुकडे, ग्रेडपोउपनि दासरे, माधव केंद्रे, सपोउपनि करले, सपोउपनि दारासिंग राठोड, हवालदार देविदास चव्हाण, मिलींद नरबाग, लोसरवार, अंमलदार मनोज राठोड, माने, दासरे, गायकवाड, लहु चाटे, पिंगलवाड, डोंगरे, मजर शेख, उमर शेख, बंडू कलंदर, मोतीराम पवार, कदम, घोगरे, जाधव, चालक लोने, देवकत्त यांनी पार पाडली.

### अवैध रेती उत्खनन करणारे साहित्य नष्ट, नांदेड महसूल पथकाची कारवाई; ६३ लाख किंमतीचा मुद्देमाल नष्ट



**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी महसूल पथकाने विष्णुपुरी परिसरामध्ये पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधासाठी गस्तीवर असताना रेती उत्खनन करणाऱ्या २ मोठ्या बोटी, एक छोटी बोट व ४ इंजिन आढळून आले. या पथकाने मजुरांच्या सहाय्याने ३ बोटी व ४ इंजिन जिलेटीने स्फोट करून नष्ट केले. तसेच ३० तराफे जाळून नष्ट करीत ६३ लाख किंमतीचा मुद्देमाल जाग्यावरच स्फोट करून नष्ट केला.

ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार, मंडळ अधिकारी कुणाल जगताप, अनिरुद्ध जोंधळे, मोहसीन सय्यद, ग्राम महसूल अधिकारी, मनोज जाधव, माधव भिसे, बरोडा श्रीरामे, जमदाडे, मनोज सरपे, महेश जोशी, महसूल सेवक बालाजी सोनटक्के, शिवा तेलंगे एक अवैध वाहतूक करणारी हायवा एमएच २६ बीसी ४८९२ जप्त करून तहसील कार्यालय परिसरामध्ये लावण्यात आला आहे. सदर हायवावर दंडात्मक फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याची तजवीज करण्यात आली आहे.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# देशाची वाटचाल सुवर्णयुगाकडे

आजचा काळ भारताने आत्मनिर्भरतेच्या मार्गावर दृढ पावले टाकण्याचा आहे. स्थानिक उत्पादन, नवउद्योग, संशोधन आणि निर्यातीला चालना दिल्यास भारत जागतिक आर्थिक शक्ती म्हणून उभा राहू शकतो. या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेतील शुभसंकेत हे केवळ आकडेवारीचे प्रतिबिंब नाही, तर उद्या उज्ज्वल आहे या विश्वासाचा प्रतीक आहेत. अनेक संकटांचा सामना करत हळूहळू स्थैर्याकडे वाटचाल करणाऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेने आता नव्या ऊर्जेसह पुनरुज्जीवनाचे संकेत दिले आहेत. पूरस्थितीतून सावरत असलेला महाराष्ट्र आणि सणासुदीच्या काळात दिसणारी बाजारातील चैतन्याची लाट या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे देशाच्या आर्थिक आरोग्याचे आशादायी चित्र उभे करत आहेत. अर्थकारणाच्या आघाडीवर सर्वात मोठी बातमी म्हणजे केंद्र सरकारने महाराष्ट्राला दिलेले ६,४१८ कोटी रुपयांचे भांडवली साहाय्य. या निधीचा वापर केवळ आपत्ती निवारणासाठीच नव्हे, तर दीर्घकालीन विकास प्रकल्पांसाठीही होणार असल्याने राज्याच्या आर्थिक कणा मजबूत होण्याची शक्यता आहे. यासोबतच, वस्तू व सेवा कर संकलनात झालेली ९ टक्क्यांची वाढ ही उपभोगतावर्गाच्या खर्च-क्षमता वाढल्याचे द्योतक आहे. रिझर्व्ह बँकेने अर्थवृद्धीचा अंदाज ६.५ टक्क्यांवरून वाढवून ६.८ टक्क्यांपर्यंत नेला आहे, तर महागाई दर २.६ टक्क्यांपर्यंत कमी होण्याची शक्यता वर्तवली आहे. याचा अर्थ असा की, देशांतर्गत बाजारपेठेत स्थैर्य परतत आहे. रेपो दर सध्या ५.५ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवण्यात आला असला, तरी आगामी काळात व्याजदर कपातीची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे गृहकर्ज, वाहनकर्ज आणि उद्योगधंद्यांना दिलासा मिळू शकतो. निर्यात क्षेत्रासाठीही रिझर्व्ह बँकेने अनेक प्रोत्साहनपर उपाययोजना जाहीर केल्या आहेत. परकीय चलन खात्यांमधील व्यवहारासाठी कालावधी वाढविणे आणि तारण मर्यादा वाढविणे या निर्णयांमुळे निर्यातदारांना नवसंजीवनी मिळेल. बँकांना आता आयपीओ कर्जसहाय्याची मर्यादा १० लाखांवरून २५ लाखांपर्यंत वाढविण्याची परवानगी देण्यात आली आहे, ज्यामुळे नवउद्योगांना भांडवल उपलब्ध होईल. हे निर्णय रोजगारनिर्मिती आणि उत्पादनवाढ दोन्ही दृष्टींनी महत्त्वाचे आहेत. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत दिसणारी तेजी हीही उत्साहवर्धक बाब आहे. जीएसटी कपातीमुळे वाहन, सोने-चांदी आणि ग्राहक वस्तूंच्या विक्रीत वाढ झाली आहे. सोन्याचे दर उच्चांकी पातळीवर पोहोचले असले तरी खरेदीत घट न होता उलट मागणी वाढली आहे, हे ग्राहकांच्या आर्थिक सामर्थ्याचे द्योतक आहे. चांदीच्या किमतीतही विक्रमी वाढ झाली असून, हे जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारतीय गुंतवणूकदारांचा आशावाद दाखवते. वाहन उद्योगातही तेजीचा सूर आहे. छोट्या कार आणि दुचाकी वाहनांवरील जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणल्याने ग्राहकांना थेट फायदा झाला. परिणामी, बाजारात विक्री वाढली आणि उत्पादन क्षेत्राला चालना मिळाली. वाहन उद्योग हा रोजगारनिर्मितीचा मोठा स्त्रोत असल्याने या क्षेत्रातील वाढ ही ग्रामीण आणि शहरी दोन्ही अर्थव्यवस्थांसाठी हितकारक ठरणार आहे. भांडवली बाजाराकडे पाहिले, तर सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. हे भारताच्या वित्तीय बाजारातील स्थैर्य आणि गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास दर्शवते. औद्योगिक उत्पादनात साडेतीन टक्क्यांची वाढ नोंदवली गेली असून, ती चार महिन्यांतील सर्वोच्च आहे. बांधकाम आणि वीज क्षेत्रात अजून सुधारणा होणे आवश्यक असले, तरी एकूण आर्थिक वातावरण सुधारते आहे. नवीन प्राप्तीकर कायदा मंजूर झाल्यामुळे सर्वसामान्य करदात्यांनाही दिलासा मिळाला आहे. अर्थात, या सर्व सकारात्मक संकेतांसोबत काही आव्हाने कायम आहेत. अतिवृष्टीमुळे कृषी उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. पूरग्रस्त राज्यांतील शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारने भरीव आर्थिक पॅकेज देणे अत्यावश्यक आहे. कारण शेती आणि ग्रामीण बाजारपेठेतील स्थैर्यच देशाच्या एकूण विकासाचा पाया आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता अशी दिसून येते की, संकटांवर मात करत भारताची अर्थव्यवस्था सशक्त होत आहे. आता सरकार, उद्योग आणि नागरिक या तिघांनी मिळून आत्मनिर्भर भारताच्या दिशेने गती दिली, तर आगामी दशक भारताचे सुवर्णयुग ठरू शकते.

# माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे!



एकदा पोलीस स्टेशन परिसरात फिरत असताना एक बाई पाहिली. तिला भांडताना पाहिलं पोलिसांशी. पोलीस तक्रार घेत नव्हते. यावरून वाद. प्रसंग होता की, तिच्या लहानशा मुलीवर बलात्कार झाला होता. ती पाड्यावरचीच असेल बहुतेक आणि कोणीतरी फिरस्त्यानं तिच्या मुली-वर बलात्कार केला होता. मी बराच वेळ थांबलो. प्रसंगाचं निरीक्षण केलं. त्यावेळेस वय कमी होतं. तेवढं कळत नव्हतं. बिचारी बाई हताश व निराश होवून मुकाट्यानं घरी परतली. आपल्या मुलीवर बलात्कार होवूनही ती गरीब असल्यानं तिची पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली नाही नव्हे तर करण्यात आली नाही. न्यायालयात जाणं तर दूरच.

अशा नेहमीच घटना घडत असतात. न्यायालयात आणि पोलीस स्टेशनलाही. न्यायालयातही पैशाचा खेळ अन् पोलीस स्टेशनलाही पैशाचाच खेळ. जो पैसा फेकेल. तोच तमाशा पाहील अशी अवस्था आणि समजा त्याबद्दल कोणी बोललंच तर न्यायालयाचाही अवमान होतो आणि पोलीसस्टेशनचाही. म्हणूनच कोणी बोलायला पाहात नाहीत. न्यायालय व पोलीस स्टेशन. जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी हे दोन्ही स्थळ उघडण्यात आली. त्यानुसार जनतेवर कोणत्याही स्वरुपाचा अत्याचार झाला तर त्याची दाद न्यायालयात व पोलीस स्टेशनला मागण्यात येत होती. न्यायालय न्याय देत होतं आणि पोलीस स्टेशनही. परंतु आज तो मिळत नाही. कारण आज हा न्याय वकील आणि साक्षीदारांच्या व पुराव्याच्या अभावी अत्याचार झालेल्या वर्गाला मिळत नाही व भलत्यालाच मिळते व चोर नाही संन्याशाला फाशी असा प्रकार घडतो.

भारत हा लोकशाहीचा देश आहे. या देशात न्यायालयात न्यायदान होतं. वकील आणि साक्षपुराव्याच्या भरवशावर. साक्षीपुरावे तपासण्यात येतात. ते बरोबर असतात. तरीही काही लोकांना न्याय मिळत नाही. वर्षानुवर्ष खटले चालतात. अख्ख्या पिढ्याच्या पिढ्या निघून जातात. परंतु न्याय मिळत नाही. न्याय मिळतं सर्व संपल्यावर. जेव्हा उपयोग नसतो. संबंधीत खटल्यात कधीकधी पक्षकार व आरोपी मरुनही जातात. परंतु खटले संपत नाहीत. ते चालत असतात. कळतं की संबंधीत व्यक्ती हा खरा होता. हेच पोलीस स्टेशनलाही घडतं. तसेच खटले चालत असतात वर्षानुवर्ष. त्यातच असे खटले लढतांना लोकांचं बरंच नुकसान होतं. काहींना खटले लढत असतांना जमीन, घरदार व मालमत्ता विकून टाकावी लागते. तरीही न्याय मिळत नाही. कधीकधी बहुमुल्य असलेला वेळ निघून जातो. परंतु न्याय मिळत नाही.

न्याय मिळत नाही. याबाबत अरुणा शानबागचं उदाहरण जीवंत आहे. ती वयाच्या पासष्टव्या वर्षी मरण पावली. ती परीचारीका होती एका इस्पीतळात. त्यावेळेस तिच्यावर पाशवी बलात्कार झाला होता व ती कोमात गेली होती. तिच्या आरोपीला बलात्काराबद्दल सात वर्षाची शिक्षा झाली व त्यानं शिक्षा भोगल्यावर आपला विवाह केला. दोन मुलंही झाली त्याला. परंतु यात त्याला तिच्यावर झालेल्या बलात्कारावर जरी शिक्षा झाली असली सात वर्षाची. तरी तिला खऱ्या अर्थानं न्याय मिळाला का? याचं उत्तर नाही असंच आहे. अशी बरीचशी प्रकरणं आहेत की काही आरोपी पुराव्याअभावी हमखास सुटतात व त्यांना न्यायालयातून न्याय मिळत नाही. यात मुख्य गोष्ट आड येते तो पैसा. हुशार वकीलांचं शुल्क जास्त आहे. ते शुल्क गरीबांना परवडत नाही व गरीबांना सरकारी वकील मागूनही मिळत नाही आणि मिळाला तर तो बोलत नाही. शिवाय एखादा खटला उभाच राहिला आणि तो खटला जर तो गरीब हारलाच तर त्याच गरीबांवर आरोपी पक्षकार बनून खटले दाखल करीत असतात बदल्याच्या भावनेने. पुढं तो मरण पावताच त्याच्या पिढ्याही त्यात उतरतात. जसा मालमत्तेचा खटला लागला.

न्याय काहींना तर अजिबातच मिळत नाही. पैसा नसतो. पैसा जिथं खायलाही नसतो. तिथं खटला भांडायला पैसा कुठून येणार? निव्वळ चपला झिजतात व जवळ काही शिल्लक असलेल्या पैशाची आणि वेळेची बरबादी होते. जी बचत आपल्या मुलांसाठी केलेली असते. असेच बरेचसे खटले आहेत की ज्या खटल्यांना अजुनही न्याय मिळा-लेला नाही. न्यायालयात न्याय मिळायला विलंब लागला. हेच ते संन्यासाला फाशीचे खटले आणि असे बरेचसे खटले आहेत की ज्यात लोकांना जलद न्याय मिळाला की जे चोर आहेत. कशाच्या भरवशावर. तर ते वकीलांच्या भरवशावर. पुढील पक्षाचा कसा वकील आहे त्यानुसार न्यायालयात न्यायदान ठरलेलं असतं. त्या वकीलांच्या हुशारीन-सार पैसाही ठरलेला असतो. चांगले वकील काही साधारण पैसे घेत नाहीत. त्यांचं शुल्क हे गरीबांना परवडणारं नसतं आणि म्हणूनच खटले हे गरीबांना परवडतच नाही. ते आ-पले पोटच भागवू शकत नाहीत. तिथं खटले लढतील कुठून? अशातच न्यायालयात त्यांना पराभवाचा सामना करावा लागणार नाही तर काय? त्यानंतरही खटले थांबत नाहीत. हीच आरोपी असलेली मंडळी लोकांच्या गरीबीपणाचा विचार न करता उलट त्यांच्यावरच खटले दाखल करतात. मग मात्र पंचायत होते. यातूनच तो गरीब व्यक्ती पैशाअभावी कोर्टातील असा खटला हारतो व त्याला तुरुंग होते.

कारागृह...या कारागृहात असे बरेच लोकं आहेत की जे गुन्हेगार नाहीत. परंतु शिक्षा भोगत आहेत. जुव्वा पाहणारी वा जुव्याजवळ उभी राहणारी माणसं. त्यांना जुव्वा समजतही नाही तरी ते शिक्षा भोगतांना दिसतात. ते जुव्वा खेळत नसल्यानं पळून गेले नाही. काही खटले दारुवाल्यांचे आहेत. ते दारु पित नाही. परंतु दारुच्या दुकानाजवळ पकडतांना सापडले. म्हणून पकडून आणलं. कारण ते दारु पित नसल्याने पळून गेले नाही. कोंबडा बाजारातही तेच हाल. पाहण-री मंडळी सापडली. कारण ती पळून गेली नाही. जे पळून गेले ते सुटले. एक तर असं हत्याकांड की त्यात पाहणारी माणसं पकडली गेली व त्यांनी शिक्षाही भोगली. जी अस्सल गुन्हेगार होती, ती पळून गेली. पळणे हा प्रकार गुन्हेगाराबाबतीत नेहमीच घडत असतो. खरा गुन्हेगार हा पळूनच जातो. तो गवसत नाही व जो गुन्हेगार नसतो. तोच सापडतो. पळत नाही म्हणून. आजही बाँब न फेकणारे भगतसिंग, राजगुरु व सुखदेव आम्ही बाँब फेकला असं सांगून निर्भीडपणं फाशावर गेली. हा इतिहास आहे.

आज न्यायालयात असाच जाणेयेणपणा. दिवसभर काही काम नाही. परंतु पाच वाजतापर्यंत थांबा. बाबू विच-रतो. आपण वकील केला काय? नाही केला म्हटल्यास आधी करा असं सांगितलं जातं. तसंच वकील जर केला आहे असे म्हटल्यास आणा म्हटलं जातं. तसं पाहता प्रत्येकाला वकील करावाच लागतो. कारण कायद्याची भाषा इंग्रजी आहे. ती देशीयांना कळत नाही. त्यानंतर वकीलही भाव खातात. त्यांना फोन केला तर ते उचलतच नाहीत आणि उचलला तर पैसे देवूनही पैसे दिले नाही असं म्हण-तात. काही वकील थोडा वेळ थांबा म्हण-तात. थोडा वेळ थांबूनही ते येत नाहीत. मग ब्रेक होतो व असे तीन वाजतात. त्यानंतर सत्र सुरु झाल्यानंतर तारीख मागीतल्यास पुन्हा वकील आले काय? त्यांना घेवून या. असं बाबूचं म्हणणं. शेवटी थोडा वेळ थांबा म्हणणारा वकील कधीकधी येतच नाही. असेच पाच वाजतात व तारीख होते तर कधी पाच वाजताच्या उंबरठ्यावर येतो वकील व तारीख होते. काहींचे वकील वेळेवर येतात. त्यांना लवकर तारीख मिळते व ते घरी जा-तात. काही वकील पाच सहा वकीलांचा मेळ घेवून येतात. सर्वांसमोर चहा पाजा म्हणतात. अपमान करतात. मग आपला खटला चांगला लढायला हवा. म्हणून चहा पाजावाच लागतो सर्वांना. ही वास्तविकताच आहे.

न्यायालयात आरोपी म्हणून जाणं हे तसं पाहता रिकामटेकड्या माणसांचं काम. तसंच गुन्हेगारी करणंही रिकामटेकड्याच माणसांचं काम. गुन्हा करा व आरामात जगा. तुरुंगातही आता तेवढं काम उरलं नाही त्यांच्याकडे. अन् न्यायालयातही नाही. फक्त गुपचूप चिंता न पालवता बसा. बसणे हीच शिक्षा. घरादाराची व मुलाबाळाचीही चिंता सोडा. खा, प्या, ऐष करा. अपेक्षा एवढीच की जिभेचे चोचले पुरवले जाणार नाही. कमी तेल नसलेलं खावं लागेल. तिखट कमी असणार. गव्हाच्या पोळीत कच असणार. तांदळात खडे निघणार. अपवाद काहीजणांना स्वादिष्ट जेवन मिळतं. शिवाय प्रकृती बिघडलीच तर चांगली रुणालये. रुणालये निःशुल्क असतात. झोपायला राजसी अंथरुणावर नसणार. शौचालयाची पुरेशी व्यवस्था नसणार. परंतु ते वातावरण सामान्य माणसांना भीतीदायक वाटतं. कारण सामान्य माणसं हे परीवारात गुंतलेली असतात.

विशेष सांगायचं झाल्यास न्यायदान व्हावं. निःष्पक्ष व कोणावरही अन्याय होण-ार नाही अशा स्वरुपाचं. त्या न्यायदानात गरीब श्रीमंत असा भेदभाव होवू नये. तिथं गरीबांनाही न्याय मागता यावा. आपला खटला आपल्यालाच लढता यावा. तेथील भाषा सर्वसामान्य माणसाला समजावी अशीच असायला हवी. वकील माध्यम नसावंच. त्यांनाही आपली बाजू मांडता यावी. हं, शिक्षा असाव्या. जशास तशा. उग्र स्वरुपाच्या. बलात्कारात अरुणा कोमात गेली ना. मग तू त्यातून सुटू नकोस. तिची आयुष्यभर चांगली सेवा कर. त्यात खंड पडता कामा नये व तुला विवाह करण्याची व मुलं पैदा करण्याची गरज नाही. बलात्कार केला ना. मग त्याचं लिंग कापायचंच आणि त्याला नपुंसक करायचंच. खुन केला ना. मग त्याचेही भरचौकात एकेक अवयव उडवायचेच आणि गोळी मारली ना. मग त्यालाही गोळी मारायचीच. असेच शिक्षेचे स्वरुप असावेत. हे शिक्षेचे स्वरुप भयंकर वाटतात नाही का? परंतु अशाच शिक्षा असाव्यात, ज्यातून संबंधीत गुन्हेगारीच बंद होईल वा कमी तरी होईल. सर्वत्र शांतता निर्माण होईल. कोणीच कोणाला छळणार नाही. त्रास देणार नाही. मग तो गरीब असो की श्रीमंत असो. गुन्हे करतांना सतरावेळा विचार करेल. तसंच न्यायालयानंही वेळखाऊ धोरण अवलंबू नये. तारखा सहा सहा महिन्याच्या दिल्या तरी चालेल. परंतु दर पंधरा दिवसानं आरोपींना बोलावून सायंकाळपर्यंत बसवून ठेवू नये. प्रत्येकाचा वेळ बहुमुल्य असतो. हं, जो रिकामटेकडा आहे, त्याला फरक पडत नाही. परंतु काही लोकांमुळे देशाचंही नुकसान होवू शकतं. तशीच गरीबांच्या येण्याजाण्यासाठी लागणाऱ्या पैशाची बरबादी करु नये. तसंच त्यांना तेव्हाच बोलवावं जेव्हा सुनावणी असेल. सुनावण्या वेळ पडल्यास दोनचार वेळा ठेवाव्यात आणि दोन चार वेळा सुनावण्या घेवून तारखा संपवाव्यात. जेणेकरुन प्रत्येक जण न्यायदानावर खुश होईल. त्रास कमी होईल. कारण खटले कमी होतील. परंतु कोणी म्हणतात की यातून रोजगार कमी होईल. वकील व कर्मचारी यांच्या पोटाचा प्रश्न निर्माण होईल. परंतु तसं काहीच होणार नाही. कारण विधात्यानं सर्वांना जन्माला घातलं ना. मग त्यानं बरोबर सर्वांच्या पोटाची सोय करुन ठेवलेली आहे. या सृष्टीत मानवच नाही तर साधा किडाही आपलं पोट व्यवस्थीत भरत आहे. मग त्याच्या पोटाला अन्न कुठून मिळतं? एवढंच आहे की आज जर एखादा बेडूक किटकाला खात असेल तर तो बेडूक मरण पावताच त्याला ते किडे खातातच. तसंच आज तो श्रीमंत असतो तर उद्या ज्याला आपण गरीब समजतो. तो श्रीमंत बनतो. कारण सृष्टीतील चक्र असंच फिरत असतं. वाफ होवून आकाशात जाणं व थंड होवून पावसाच्या स्वरुपात पुन्हा खाली येणं. आज जो कठड्यात असतो संबंधीत आर-ोपानं. उद्या दुसराच कठड्यात राहतो संबंधीत आरोपानं. समयचक्र कोणालाच सोडत नाही. तसाच पुनर्जन्मही मिळतोच व सगळं केलेलं पाप एक ना एक दिवस भरुन द्यावंच लागतं. कधी आपण ज्यांना अति त्रास दिला असेल. तोच आपला पुत्र बनून येतो व आपल्याला भयंकर त्रास देतो की आपल्या नाकीनऊ येते. हे विसरुन नये. याबाबत एक कहाणी आहे. दोन चांगले मित्र. पार्टनर होते धंद्यात. धंदा चांगला तेजीत आल्यावर एका मित्रानं दुसऱ्याची संपत्ती हडपली व त्याचा खुनही केला. तो संपला. परंतु त्यानं त्याच्याच पुत्राच्या रुपात जन्म घेतला. हा पुत्र सतत आजारी असायचा. त्याला उपचारार्थ पैसे लावण्यात त्या माणसाची पुर्ण मालमत्ता गेली. आता तो भिकारी बनला होता. शेवटी त्याचा मुलगा मरण पावला. परंतु मरतांना त्यानं सांगीतलं होतं की माझं कार्य संपलेलं आहे. मी तोच आहे तुझा मित्र की ज्याची तू संपत्ती हडप केली होती व माझा खुनही केला होता. आता मी तुला संपवलेलं आहे. मी गेल्यावर तू असा असा तडपशील. मरण मागशील. परंतु तुला मरणही येणार नाही. पुनर्जन्म... पुनर्जन्मही होतो. आपण कुणाला त्रास दिला तर. म्हणूनच कोणीही कोणाला त्रास देवू नये. आपण कुणाला त्रासच दिला नाही तर कशाचीच चिंता करण्याची गरज उरणार नाही. न्यायालयात प्रकरणं जाणार नाही. ताटकळत दिवसभर बसावं लागणार नाही. तुरुंगात जावं लागणार नाही. पोलीस नसणार व वकीलही नसणार. ना न्यायाधीश असणार अन् ना न्यायालय. सगळे गुण्यागोविंदानं व सुखासमाधानानं नांदतील. मगच आपण विकास करु. आपला देश विकास करेल व एक सशक्त महाशक्ती बनेल. जे आपलं स्वप्न आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# डॉ. होमी जहांगीर भाभा



भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ. जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती.

डॉ. होमी यांना लहानपणापासून विज्ञ-ानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञ-ानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली, पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही.

देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थ-ापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ. होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ. होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ. होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

१९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ. भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ. होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# जागतिक बचत दिन : आर्थिक जबाबदारीचे सामाजिक भान

जागतिकीकरणाच्या, उपभोगता-वादाच्या आणि झपाट्याने बदलणाऱ्या आर्थिक व्यवस्थेच्या या युगात 'बचत' ही केवळ आर्थिक क्रिया न राहता ती एक सामाजिक मूल्य, संस्कृती आणि नागरिक जबाबदारी म्हणून पाहिली जाऊ लागली आहे. दरवर्षी ३० ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जाणारा 'जागतिक बचत दिन (World Thrift Day)' म्हणजे केवळ आर्थिक संस्थांचा उत्सव नसून, तो व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या एकत्रित शाश्वत भविष्यासाठीची सजगता दाखवणारा दिवस आहे. या दिवसा-ची संकल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळानंतर निर्माण झाली. १९२४ मध्ये इटलीतील मिलान येथे झालेल्या पहिल्या International Savings Bank Congress मध्ये या दिनाचे औचित्य जाहीर करण्यात आले. त्याम ागील उद्दिष्ट होते की लोकांना बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, आणि 'थोडे आज राखले तर उद्याचा दिवस सुरक्षित राहील' हा मूलभूत विचार जनमानसात रुजवणे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, 'बचत' ही फक्त पैशाची साठवणूक नाही; ती समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आणि सांस्कृतिक शिस्तीचा भाग आहे. प्रत्येक समाजाची आर्थिक रचना त्याच्या सामाजिक वृत्तीवर आधारित असते. मॅक्स वेबर यांनी मांडलेल्या 'झींीशींीरपीं ऐींहळल रपव िंहश डिीीळीं ष उरिीींरश्रळीा' या सिद्धांतानुसार, आर्थिक शिस्त, मेहनतीची सवय आणि बचतीची वृत्ती या गोष्टी भांडवलशाहीच्या वाढीस कारणीभूत ठरल्या. यावरून दिसते की बचत ही केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचीही गुरुकिल्ली आहे. समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारपणे संसाधनांचा वापर करणे आणि उद्यासाठी काही राखून ठेवणे हेच शाश्वत समाजाचे लक्षण आहे.

भारतीय समाजाच्या पारंपरिक संरचनेत 'बचत' ही संकल्पना फार जुनी आहे. भारतीय संस्कृतीत 'अर्धेच खा, उरलेले उद्यासाठी राखून ठेवा' अशी जीवनशैली सुचवण्यात आली होती. आपल्याकडे 'मावळता सूर्य पाहून दिवा विझवू नका' अशी म्हण आहे, तिच्यामागेही भविष्याची तयारी, नियोजन आणि शिस्तबद्धता यांचा संकेत आहे. ग्रामिण समाजात पूर्वी घरात धान्य, बियाणे, किंवा पैशाचा थोडासा साठा ठेवण्याची सवय होती. स्त्रिया आपल्या अल्प



उत्पन्नातूनही सोन्याचे दागिने, धान्य किंवा थोडेसे पैसे साठवून ठेवत असत हेच प्रत्यक्षात 'घर-ोघरी बचत संस्कृतीचे' पहिले रूप होते.

आजच्या आधुनिक सम ाजात मात्र उपभोगतावादाची प्रवृत्ती वाढली आहे. त्वरित समाधान, लक्झरीचा मोह आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे 'उद्यासाठी बचत' ही कल्पना मागे पडत चालली आहे. सम ाजशास्त्रीय दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे परिवर्तन आहे. एक काळ असा होता की बचत ही 'म ध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेचा' आधार होती. पण आता ती हळूहळू 'उपभोगवादी संस्कृतीच्या' प्रभावाखाली दबली आहे. जाहिराती, सोशल मीडिया, ब्रँडेड जीवनशैली, आणि कर्जाधारित अर्थव्यवस्था यांनी व्यक्तीच्या विचारांवर परिणाम केला आहे. 'आत्ताच खर्च करा, नंतर विचार करा' ही मानसिकता नव्या पिढीच्या जीवनशैलीत शिरली आहे. या प्रवृत्तीचा परिणाम केवळ आर्थिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक अस्थैर्य निर्माण करणारा आहे. समाजशास्त्रानुसार, बचत ही सामाजिक सुरक्षा यंत्रणेचा पाया आहे. जे समाज भविष्यासाठी नियोजन करतात, संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करतात आणि अनावश्यक खर्च टाळतात, ते समाज संकटकाळात अधिक मजबूत राह-तात. उदा. कोविड-१९ महामारीच्या काळात ज्या कुटुंबांकडे थोडीफार बचत होती, त्यांनी रोजगार, उत्पन्न आणि आरोग्य संकटांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे गेले. दुसरीकडे, अनियोजित खर्च करणाऱ्या, किंवा 'दिवसेंदिवस जगणाऱ्या' कुटुंबांना अत्यंत आर्थिक ताण सहन करावा लागला. त्यामुळे बचत ही केवळ वैयक्तिक नाही तर सामूहिक सामाजिक स्थैर्याची गुरुकिल्ली आहे.

भारतीय ग्रामीण समाजात बचती-चे रूप 'स्वयं-सहायता गटां'द्वारे अधिक दृढ झाले आहे. महाराष्ट्रातील महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून केवळ आर्थिक स्वावलंबनच मिळवले नाही, तर सामाजिक निर्णय प्रक्रियेतही आपला सहभाग वाढवला आहे. अशा गटांनी बचतीची संस्कृती समाजाच्या तळागाळात रुजवली आहे. याला समाजशास्त्रीय अर्थाने 'ग्रामस्तरीय सामाजिक पूंजी' (ीळरश्र लरिळींरश्र) म्हणता येईल. बचतीद्वारे निर्माण झालेला हा सामाजिक विश्वास आणि सहकार्याचा पाया, समाजातील परस्परावलंबित्व अधिक दृढ करतो.

अर्थशास्त्रज्ञ ॲमर्त्य सेन यांनी सांगितले आहे की, विकास म्हणजे केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर मानवी क्षमतांची वाढ होय. बचत हे त्या क्षमतावृद्धीचे मूलभूत साधन आहे. बचत आपल्याला स्वावलंबन देते, निर्णयक्षमता वाढवते आणि जीवनातील अनिश्चिततेविरुद्ध सुरक्षा कवच तयार करते. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक बचतीचे महत्त्व ओळखतो, तेव्हा समाजात 'आर्थिक लोकशाही' मजबूत होते. याचा अर्थ, समाजातील सर्व स्तरांना आपल्या गरजा पूर्ण करण्याची आणि भविष्यासाठी नियोजन करण्याची समान संधी मिळते. जागतिक बचत दिनाचा उद्देश केवळ बँकांमध्ये पैसे ठेवण्यापुरता मर्यादित नाही. त्याम ागे एक व्यापक सामाजिक अर्थ आहे, तो म्हणजे 'जबाबदार उपभोग' आणि 'शाश्वत विकास' होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, बचत आणि शाश्वतता या एकमेकांशी घट्ट निगडित संकल्पना आहेत. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संसाधनांचा वापर मर्यादित केला आणि उद्यासाठी थोडे राखून ठेवले, तर समाजातील विषमता कमी होईल. अशा प्रकारे बचत ही समानतेच्या सामाजिक तत्त्वाची पायाभरणी करते. पण बचत केवळ आर्थिक न राहता ती मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपातही आवश्यक आहे. वेळेची बचत, ऊर्जेची बचत, संसाधनांची बचत हे सर्व 'सामाजिक जबाबदारी'च्या रूपात पाहायला हवे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२,

## थोडक्यात...

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात १२ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २९ ऑक्टोबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते १२ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

### कापूस उत्पादक शेतकऱ्यांना किसान मोबाईल ॲपद्वारे स्लॉट बुकिंग करता येणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय कपास महामंडळ (सीसीआय)ने कापूस किसान मोबाईल ॲप नावाने एक मोबाईल ॲप्लिकेशन सुरु केले आहे. जे कापुस हंगामात २४ तास व ७ दिवस उपलब्ध असेल. कापूस किसान मोबाईल ॲपद्वारे नोंदणी व स्लॉट बुकींग प्रक्रियेस मदत करण्यासाठी एक विशेष लिंक तयार करण्यात आली आहे. ज्यामध्ये पमध्ये नोंदणी व स्लॉट बुकींगसाठी सविस्तर माहिती व पायऱ्या दिलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी https://www.youtube.com/kapaskisan-official या लिंकवर जाऊन स्थानिक भाषेत तयार केलेली माहिती व व्हिडीओ पाहावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे विभागीय व्यवस्थापक नांदेड यांनी केले आहे.

# सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत करावे –आ. श्रीजया चव्हाण

## भोकरमध्ये पेरकेवाड समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व परिचय मेळावा



**भोकर (प्रतिनिधी)–** पेरकी, पेरकेवार, पेरकेवाड समाज हा सक्षम व परिश्रम करणारा समाज असून सर्वांगीण विकासासाठी पेरकेवाड समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत करावे असे आवाहन भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजया चव्हाण यांनी केले. भोकर येथील आयोजित आयोजित करण्यात आलेल्या पेरकी, पेरकेवार, पेरकेवाड समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार व परिचय मेळाव्यात त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना आ. चव्हाण म्हणाल्या की, युवकांनी स्वतच्या पायावर उभे राहिले पाहिजे. शिक्षणाशिवाय विकास होऊ शकत नाही. पालकांनी मुलांकडे लक्ष देवून त्यांना घडवले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पेरकेवाड समाजाच्या समस्या सोडवू असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाला आदिलाबादचे आ. शंकरअण्णा पायली, राम तोडेवाडकर, शंकुतलाबाई एंबडवार, संदीप भुरेवार, विजय भुरेवार यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. शंकरअण्णा पायली यांनी सकारात्मक विचार ठेवा, पुढे जाणाऱ्यांना मागे ओढू नका, समाजाने एकत्र राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात शितल शिंगणवार, प्रशांत डाकेवाड, स्नेहल गोपतवाड, आदित्य बुटनवाड, ओंकार शानमवाड, वैष्णवी शिंगरवाड, आदी विद्यार्थ्यांसह प्रशासनात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्काराचे आयोजन कार्यक्रमाचे संयोजक, शासकीय कंत्राटदार गोविंदराव उल्लेवाड यांच्यावतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी सुबनवार यांनी केले.

यावेळी सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी सभापती प्रकाशराव देशमुख भोसीकर, भाजपचे तालुकाध्यक्ष दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड, उपसभापती बालाजी शानमवाड, किशोर पाटील लगळूदकर, रामचंद्र मुसळे, दिलीप देशमुख सोमठाणकर, डॉ. मनोज गिमेकर, बाबुराव गोवतवाड, बालाजी पिंगलवाड, मारोती पिंगलवाड, संभाजी आलेवाड, अशोक अनगुलवार, ॲड. सुरेश पनसवाड, सटवाजी शेंडगे, मारोती बेरदेवाड, संभाजी आलेवाड, प्रकाश बच्चेवाड राजेश, शिंगनवाड आदींची उपस्थिती होती.

# सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त 'सरदार @ १५० एकता अभियानात' सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर रोजी भव्य पदयात्रेचे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'सरदार @ १५० एकता अभियान'अंतर्गत ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात जिल्ह्यात ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, तसेच विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

या अभियानांतर्गत भारत सरकारच्या माय भारतच्या नेतृत्वाखाली सरदार @ १५० युनिटी मार्च या देशव्यापी उपक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. याचे उद्दिष्ट देशातील युवकांमध्ये एकता, देशभक्ती आणि नागरी जबाबदारीची भावना जागृत करणे हे आहे. या मोहिमेद्वारे युवकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आणि नागरी सहभागातून एक भारत, आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास प्रोत्साहित केले जाईल.

या कालावधीत पदयात्रा, विविध स्पर्धा आणि प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये डिजिटल फेसवर सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध स्पर्धा, सरदार @ यंग लीडर्स प्रोग्राम अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा, आरोग्य शिबिरे, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर व्याख्याने, ड्रग्ज मुक्त भारत प्रतिज्ञा इ. उपक्रमांचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले की, युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे, तसेच विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत युवा पिढीला सक्रिय योगदान देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी जिल्हास्तरीय पदयात्रा पोस्टरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नांदेड येथे ३१ ऑक्टोबर व ७ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ ऑक्टोबर रोजी ही पदयात्रा जुना मोंढा ते जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनापर्यंत काढण्यात येणार आहे. तरी या पदयात्रेत सर्व विद्यार्थी, नागरिक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्व विभाग, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# नायगावमधील विविध भागात दुर्गंधीचा कहर; नागरिकांमध्ये तीव्र संताप

## नायगाव नगरपंचायतीचे दुर्लक्ष; सर्वत्र घाणीचे साम्राज्य



**नायगाव (प्रतिनिधी)–** नायगाव नगरपंचायत हद्दीतील महात्मा फुले कॉलनीसह विविध परिसरात गेल्या काही दिवसांपासून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून सर्वत्र दुर्गंधीचे वातावरण पसरले आहे. नाल्यांतील साचलेले पाणी, तसेच रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे आणि डासांचा प्रादुर्भाव यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नायगाव नगरपंचायतीकडे स्थानिक नागरिकांनी वारंवार तोंडी तक्रारी करूनही नगर पंचायतीकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने नागरीकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नायगाव सारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरात नियोजनबद्ध विकासाची गरज दिवसेंदिवस अधिक भासत असताना नगरपंचायत अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या निष्क्रियतेमुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तर प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# संभाजी ब्रिगेड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक लढविणार



**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका संभाजी ब्रिगेड लढविणार आहे, असा निर्णय येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत घेण्यात आला.

ही बैठक संभाजी ब्रिगेडचे अमरावती विभागीय अध्यक्ष तथा नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख गजानन भोयर, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

संभाजी ब्रिगेडने वेळोवेळी शेतकरी कष्टकरी, युवक तसेच तळागाळातील जनतेचे कामे करण्याचे तसेच सरकार दरबारी मांडण्याचे काम केले आहे. शंभर टक्के समाजकारण शंभर टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन युवकांचे वैचारिक आक्रमक संघटन म्हणून संभाजी ब्रिगेडकडे बघितल्या जाते. राजकारण हे सध्या समाजकारणावर आधारित राहिले नाही. निवडून आलेले प्रतिनिधी आम्ही कसे निवडून आलो, असे म्हणत जनतेची कामे करत नाहीत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी जनतेची कामे करावीत. विविध योजना जनतेपर्यंत न्याव्यात असे आवाहन संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी केले.

संभाजी ब्रिगेडने आतापर्यंत कोणाचे नुकसान करण्याचे काम केले नाही. महाराष्ट्रात जातीय धर्मीय दंगली बंद करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे राजकारण करण्यासाठी महत्वाचा पाया आपला पक्का आहे. फक्त कार्यकर्त्यांनी धनदांडग्यांना न जुमानता प्रामाणिकपणे कार्य करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका संभाजी ब्रिगेड लढविणार आहे, असे सर्वानुमते बैठकीत ठरले आहे, अशी माहिती संभाजी ब्रिगेड अमरावती विभागीय अध्यक्ष तथा नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख गजानन भोयर यांनी दिली. या बैठकीला संभाजी ब्रिगेड उत्तर जिल्हाध्यक्ष कमलेश कदम, ग्रामीण जिल्हाध्यक्ष जेजेराव शिंदे करडखेडवाडीकर, लोकसभा अध्यक्ष परमेश्वर पाटील आदींची उपस्थिती होती.

# डॉ. मनोहर तोटरे यांचा अनेक कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश



**नायगाव (प्रतिनिधी)–** आदर्श गाव म्हणून राज्यभरात प्रसिद्ध असलेल्या गौरी शेळगावचे सरपंच डॉ. मनोहर तोटरे यांनी आपल्या अनेक कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या या प्रवेश कार्यक्रमात नायगाव विधानसभेचे आ. राजेश पवार व डॉ. अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन साठे यांच्या उपस्थितीत डॉ. तोटरे यांनी भाजप प्रवेश केला. यावेळी आ. पवार यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

# पर्यावरण चळवळीशी लोकांना जोडण्याचे काम करत राहूया –धीरज वाटेकर

## माहूर येथे नववे पर्यावरण संमेलन उत्साहात संपन्न




**माहूर (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांची प्रेरणा आणि स्व. वृक्षमित्र आबासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण पर्यावरणाच्या जनजागरण चळवळीचे काम करत आहोत. या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे मुख्य काम या चळवळीशी लोकांना जोडणे हे आहे. मंडळाच्या कामाला अधिकाधिक पर्यावरण मित्रांशी जोडत पर्यावरण चळवळीला अधिकाधिक जनसमुदायाचा पाठिंबा मिळण्यासाठी आपण सदैव कार्यरत राहूया, अशी साद लेखक आणि पर्यावरण-पर्यटन चळवळीतील कार्यकर्ते धीरज वाटेकर यांनी घातली.

निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्यावतीने येथील श्रीजगदंबा धर्मशाळा परिसरात आयोजित नवव्या पर्यावरण संमेलनात ते बोलत होते. संमेलनाचे उद्घाटन संमेलन अध्यक्ष पद्मश्री शब्बीर (मामू) सय्यद (बीड) यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार अभिजित जगताप, वन अधिकारी चव्हाण, स्वागताध्यक्ष उद्योजक गोपाळसिंह चौहान, मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे, वरीष्ठ कार्याध्यक्ष विलास महाडिक, नांदेड जिल्हाध्यक्ष सारनाथ लोणे, राज्य उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कऱ्हाळे, निर्मला म्हस्के, श्रीमती छायाताई राजपूत आदी उपस्थित होते.

माहूरमध्ये चालुक्य, यादवकाळात जलाशय निर्माण करण्यात आले. महाराष्ट्रात जाणीवपूर्वक जलाशय निर्माण करणे व त्याचा योग्य उपयोग करून घेण्याची सातत्यपूर्ण परंपरा आहे. माहूरमधील जलाशयांच्या प्राचीन जागांचे संरक्षण व्हायला हवे. त्यांचे महत्त्व टिकायला हवे आहे. या स्थानांचे सुशोभीकरण आणि सौन्दयीकरण करताना मूळ बदलू नये. जंगलांमध्ये आजही दुर्लक्षित कुंडे आहेत. कुंडांची निगा राखली जायला हवी. याभूमीत श्रीक्षेत्र माहूर परिक्रमा सुरू आहे. तिला भविष्यात पर्यावरणीय पर्यटन अंगाने नियमित स्वरुपात आणता येईल का? पाहायला हवं आहे. आई रेणुकेने आपल्या सर्वांच्या हाताला पर्यावरण प्रबोधनाची ही चळवळ पुढे नेण्यासाठी बळ द्यावे अशी विनंती वाटेकर यांनी याप्रसंगी बोलताना केली. आभार नांदेड जिल्हाध्यक्ष सारनाथ लोणे यांनी मानले.

# भोकर पोलीस ठाण्यात परस्परविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर शहरातील शिवाजी चौक भागात दोन घटना अर्ध्या तासाच्या अंतरात घडल्या असून याप्रकरणी परस्परविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भोकर शहरातील बिलालनगर भागात राहणारा औषधी विक्रेता मोहम्मद रमीज अख्तर अब्दुल रफीक (वय २७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचे शिवाजी चौक भागात भारत मेडिकल स्टोअर आहे. दि. २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता विश्वास मारोती शामनवाड, साईनाथ शेंडगे, आणि इतर चार असे सहा जणांनी मेडिकल समोर मोटारसायकल उभी करण्याच्या कारणावरून गैरकाद्याची मंडळी जमवून भारत मेडिकलमध्ये घुसून त्यांना मारहाण करून सामानाचे नुकसान केले. त्यांच्या खिशातील मोबाईल आणि गल्ल्यातील रोख रक्कम ३ हजार रुपये काढून घेत जिवे मारण्याची धमकी दिली.

याच ठिकाणी अर्धा तास अगोदर यावेळेत दिलेल्या तक्रारीनुसार विश्वास मारोती शामनवाड यांनी तक्रार दिली आहे की, रमीज अख्तर, मुखीद शकील आणि इतर सहा जणांनी विश्वास शामनवाड व त्यांच्यासोबतचे साक्षीदार स्कुटीवरून जात असताना त्यांना अडवले आणि जुन्या भांडणाच्या कारणावरून त्यांच्या खिशातील चार हजार रुपये रोख रक्कम बळजबीरने काढून घेत जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी भोकर ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# देशात शिक्षण क्रांती निर्माणासाठी सर्वस्व अर्पण करू -कामाजी पवार




**नांदेड (प्रतिनिधी)–** देशात शिक्षण क्रांती झाली पाहिजे यासाठी आमचा लढा शेवटच्या श्वासापर्यंत राहील. प्रत्येक भारतीयास सम्यकदृष्टी प्राप्त होऊन अविद्या समूळ नष्ट झाली पाहिजे यासाठी आपण सर्वस्व पणाला लावून चळवळीत शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांनी केले.

आंबेडकरवादी मिशन येथे आयोजित शिक्षण क्रांती सोहळ्यात सत्काराला उत्तर देताना कामाजी पवार बोलत होते. कामाजी पवार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित शिक्षणक्रांती सोहळ्यात आंबेडकरवादी मिशनच्यावतीने पाच लाख रुपये किंमतीचे यूपीएससी अभ्यासाच्या तयारीचे ग्रंथ विविध शैक्षणिक संस्थांना प्रदान करण्यात आले.

किनी आणि तामसा येथील जि.प. हायस्कूलला प्रत्येकी २५ हजार रुपयांचे ग्रंथ भेट देण्यात आले. हज हाऊस मुंबई, मातोश्री प्रतिष्ठान, हिप्परगा थडी येथील मातंग वस्तीमधील वाचनालय यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे ग्रंथ विनामूल्य देण्यात आले. यापूर्वी नांदेड येथील उर्दू घर व मुस्लिम संस्थेला एक लाख रुपयांचे ग्रंथ भेट देण्यात आले. एसजीजीएस इंजिनिअरींग कॉलेज, अहिल्यादेवी वाचनालय यांना ग्रंथ भेट देण्यात आले. तसेच पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी निशुल्क स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाची सोय करण्यासाठी प्रवेश देण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. मुस्लिम विद्यार्थ्यांना आंबेडकरवादी मिशनच्यावतीने निःशुल्क प्रवेश दिला जाईल, असे आवाहन याप्रसंगी आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले.

यावेळी माजी सनदी अधिकारी एकनाथ मोरे, डॉ. गोविंद नांदेडे, डॉ. संग्राम जोंधळे, डॉ. राजाराम माने, डॉ. रवी सरोदे, कदम उत्तम सोनकांबळे, शशी नंदा, बालाजी कंठेवाड, मारोती कंठेवाड, दिगंबर मोरे, शेख समदानी, डॉ. शिवा कांबळे, डॉ. हनुमंत भोपाळे, देवीदास पवार, किरण सावंडकर, अरुणाताई पाटील, यांच्यासह डॉक्टर, प्राध्यापक, अधिकारी, शिक्षक व बुद्धीजीवी मान्यवरांची उपस्थिती होती.

# स्वारातीम विद्यापीठात राष्ट्रीय पातळीवर आण्विक डॉकिंग या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन




**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील जैविक शास्त्र संकुलात राष्ट्रीय पातळीवरील आण्विक डॉकिंग या विषयावरील पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. हे प्रशिक्षण २७ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान संपन्न होणार आहे.

उद्घाटनासाठी डॉ. शैलेश वढेर, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य हे लाभले. या प्रशिक्षणासाठी विषय तज्ञ म्हणून डॉ. आशिष गुळवे, हनुमंत सूर्यवंशी, राजेश्वर कैतवाड संगणकीय जीवशास्त्र विभाग उपपरिसर प्रस्तुत विद्यापीठ व चंदन दिपके कृषी तंत्रज्ञान महाविद्यालय लोणी हे उपस्थित होते.

आण्विक डॉकिंग हे स्ट्रक्चरल मोलेक्युलर बायॉलॉजि आणि संगणकच्या मदतीने औषध निर्मिती प्रक्रिया यामध्ये महत्वाचे साधन आहे. याचा वापर अनुपातळीवर लहान रेणू आणि प्रथिन यामधील परस्पर संवादाचे मॉडेल तयार कार्यनासाठी केले जाऊ शकते. तसेच मूलभूत जैवरासायनिक प्रक्रियेचा खोलवर अभ्यास करता येतो. ही संगणकीय जीवशास्त्र आणि औषध निर्मिती मधील प्रक्रिया आहे. जी एखाद्या ठराविक प्रथिन आणि लहान रेणू यांच्यातील परस्पर संवाद दर्शविते कारण संभाव्य औषधाची चाचणी करण्यासाठी याचा वापर होतो.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अशोक महाजन, प्र. कुलगुरू याचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्वतः हजर राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

लग्नामध्ये करण्यात येणारे सर्वच विधी महत्त्वाचे असतात. त्यातल्या त्यात साखरपुड्याचे महत्त्व मोठे आहे. लग्न असो वा साखरपुडा सर्वात जास्त लोकांचं लक्ष असतं ते म्हणजे नवरीवर. त्यामुळे या दोन्ही विधीमध्ये मेकअप खास असणे अत्यंत गरजेचे आहे. सुंदर, आकर्षक, बोल्ड आणि ग्लॅमरस अशी नवरी आपल्याला विविध ठिकाणी दिसून येते. साखरपुड्यांच्या विधींना सहसा नवरी लाईट मेकअप करणे अधिक सोयीस्कर समजते.



# साखरपुड्याला दिवसा ग्लॅमरस!



## जाड लाईनर, बोल्ड आयब्रो आणि लाल लिपस्टिक

आपल्या साखरपुड्याच्या कार्यक्रमाच्या वेळी तुम्ही अशा स्वरूपाचा मेकअप नक्कीच करू शकता. हा मेकअप लुक करण्यासाठी तुम्हाला तुमच्या आयब्रोज हायलाईट कराव्या लागतील आणि ओठांना लाल लिपस्टिक लावल्यानंतर ती अधिक बोल्ड असेल याची काळजी घ्या. डोळ्यांची सुंदरता वाढविण्यासाठी तुम्ही जाडसर आयलाईनर लावणे हा एक चांगला पर्याय आहे. असा मेकअप लुक तुमच्या आऊटफिटसाठीही योग्य ठरतो आणि नवरीला अधिक आकर्षक बनवतो. विशेषतः तुम्ही साखरपुड्यात लेहेंगा घालत असाल तर हा तुमच्यासाठी परफेक्ट लुक आहे.

## स्मोकी मॅट ब्राऊन आय मेकअप लुक

स्मोकी मॅट ब्राऊन आय मेकअप लुक करण्यासाठी मिड टोन शॅडो लावून सुरुवात करा. एक सूक्ष्म स्मोकी बेस बनविण्यासाठी तुम्ही ग्रे अथवा ब्राऊन शेडचा पर्याय निवडा. लॅश लाईनवर लायनर लावा. लायनरच्या वर चारकोल अथवा स्मोकी मॅट ब्राऊन रंगाचा टोन शॅडो पुन्हा लावा. शॅडोच्यावर आणि खाली नीट मिक्स करा. खालच्या पापण्यांच्या बेसवर काजळ लावा आणि त्यावर खालची लॅशलाईन लावा. त्यानंतर स्मोकी रंगाच्या फिनिशिंगसाठी तुम्ही तुमच्या बोटांचा वापर करावा. स्मोकी आयमध्ये मस्कारा लावणे हादेखील महत्त्वाचा भाग असतो. मस्कारा लावण्याची पद्धत तुम्हाला माहीत नसेल तर ती माहीत करून योग्य स्वरूपात मस्कारा लावा. सर्वात शेवटी फिनिशिंग देण्यासाठी तुम्ही तुमच्या बोटांनी एक चमकदार शॅडो डोळ्यांच्या वर लावा आणि तुमच्या साखरपुड्याचा लुक होईल एकदम परफेक्ट!

## शिमरी न्यूड डोळे आणि ग्लॉसी पिच ओठ

तुम्ही तुमच्या साखरपुड्यासाठी योग्य लुकचा विचार करत असाल तर हा लुक नक्कीच परफेक्ट आहे. साखरपुड्याचे विधी जर संध्याकाळच्या वेळी असतील तर त्यासाठी हा परफेक्ट, स्मोकी आईज आणि पीच न्यूड लिपस्टिक लुक मिळविणे सोपे आहे. फ्लॉलेस स्मोकी आईज लुकसाठी तुम्ही तुमच्या पापण्यांना प्राईमर लावा आणि त्यावर सेटिंग पावडर लावा. जेणेकरून तुमच्या स्किनटोनसह मॅच होईल आणि पॅची दिसणार नाही. त्यानंतर ट्रान्झिशन शेडमध्ये एक नरम ब्राऊन आयशॅडो शेड लावा आणि मग अँगल्ड ब्रशचा उपयोग करा. त्यानंतर आपल्या खालच्या लॅश लाईनवरपण रंग लावा. आपल्या डोळ्यांची आऊटलाईन करून झाल्यावर लिक्विड आयलायनरचा वापर करावा. आपल्या चेहऱ्यावर मिनिमल मेकअप ठेवा आणि चकचकीत ब्लश अजिबात वापरू नका. ओठांसाठी तुम्ही न्यूड शेडच्या लिपस्टिकचा अथवा न्यूड लिक्विड लिपस्टिक अथवा ग्लॉसी पीच लिपस्टिकचा वापर करावा.

## मिनिमल मेकअप लुक

मिनिमल स्वरूपाच्या मेकअप लुकसाठी आपल्या त्वचेवर क्लिन्झिंग, टोनिंग आणि मॉईस्चराईजिंगची गरज आहे. त्वचेवरील डाग लपविण्यासाठी तुम्ही पूर्ण कव्हरेज देणारे फाऊंडेशन वापरा आणि आपल्या चेहऱ्याला लावा. यानंतर डोळ्यांखाली, ओठांच्या किनाऱ्यावर आणि आपल्या हनुवटीवर तुम्ही स्पॉट करेक्टर क्रिम लावा. मस्काऱ्याचा वापर करताना तुम्ही पापण्या कर्ल करायला विसरू नका. कर्लिंग टूलचा वापर तुम्ही करू नका आणि मस्काऱ्याचा एकच कोट लावा. याशिवाय तुम्ही आयब्रो सेट करण्यासाठीही मस्काऱ्याचा वापर करू शकता. ओठांच्या मेकअपसाठी तुम्ही गडद अथवा लाऊड लिपस्टिक शेड्सचा अथवा ब्राऊन लिपस्टिकचा वापर करू शकता. तुम्हाला न्यूड रंगाच्या लिपस्टिकचा वापर करायचा असेल तर तुम्ही बेबी पिंक अथवा लिप बामचा वापर करावा. आपली लिपस्टिक अथवा लिप बाम तुम्ही डायरेक्टली ओठावर लावण्यापेक्षा बोटावर घ्या आणि मग लावा. याचा प्रभाव अधिक चांगला दिसून येतो. या सर्व मेकअप आयडिया तुम्हाला तुमच्या साखरपुड्याचा लुक अधिक सुंदर दिसण्यास आणि आकर्षक दर्शविण्यासाठी मदत करतील. तसंच तुम्ही सर्वाधिक सुंदर नक्कीच दिसाल.



# लांब वेणी ट्रेंडमध्ये...

जुनी फॅशन नव्या रुपाने परतत असते हे आपल्या सगळ्यांना माहीत आहे. बेलबॉटम पँट्स, फिश कट स्कर्ट, केसांचा बनपासून वेगवेगळे फॅशन ट्रेंड जे जुने होते ते आता पुन्हा एकदा दिसू लागले आहेत. सध्या लग्नाचा सीझन सुरू झाला आहे. या सीझनमध्ये शॉपिंग आणि आलेल्या वेगवेगळ्या हेअरस्टाईल्स पटकन कळून येतात. ज्यांची लग्न साधारण 20 वर्षांपूर्वी झाले असेल त्यांना लांब वेणीचा लुक नक्कीच माहीत असेल. हल्ली पुन्हा एकदा केसांची लांब वेणी घालण्याचा ट्रेंड आलेला आहे. लग्नातील कोणत्या लुकवर तुम्हाला ही लांबवेणी चांगली दिसेल ते जाणून घेऊया...

- ट्रेडिशनल लांब वेणी : साऊथ इंडियन लग्नामध्ये लांब वेणी आणि त्यावर विशिष्ट हेअर ॲसेसरीज लावली जाते. त्यामुळे या वेणी खूपच छान दिसतात. तुमचे केस लांब नसले तरी देखील तुम्हाला केसांची सप्लिमेंट लावून मग छान वेणी घातली जाते. ट्रेडिशनल वेणी दिसायला खूपच सुंदर दिसते. जर तुमचा लेहंगा एकदम ट्रेडिशनल असेल आणि तुम्हाला थोडी ट्रेडिशनल हेअरस्टाईल हवी असेल तर तुम्ही मस्त ट्रेडिशनल लांब वेणी बांधू शकता. त्यावर तुम्ही गजरा जरी गुंडाळला तरी देखील ती हेअरस्टाईल भरलेली दिसते.





- परांदा वेणी : पंजाबी वेणी असेल तर त्याच्या खाली परांदा अगदी हमखास लावला जातो. जर तुम्हाला वेणीच्या शेवटी थ्रेड आलेले आवडत असेल तर तुमच्यासाठी ही वेणी खूपच सुंदर आहे. इंडो- वेस्टर्न कपड्यांवर म्हणजेच शरारा किंवा गरारा पँट्सवर तुम्हाला अगदी हमखास अशा प्रकारे वेणी घालता येतात. परांदा लावलेली वेणी बांधताना तुम्हाला पाच पेढ्यांची वेणी किंवा सात पेढ्यांची वेणी असे देखील तुम्हाला करता येऊ शकते. तुमच्या आवडीच्या ड्रेसनुसार तुम्हाला त्यावर परांद्याचा रंग निवडता येतो.
- ट्विस्टिंग वेणी : केसांची वेणी न घालता जर तुम्हाला नुसता केसांना पीळ देऊन वेणी घालायची असेल तर तुम्ही ट्विस्टिंग वेणी प्रकारातील वेणीही बांधू शकता. अशी हेअरस्टाईल खूप जास्त उठून आणि खुलून दिसते. काही जण याला जास्मिन हेअर स्टाईल असे देखील म्हणतात. ट्विस्टिंग वेणी दिसायला खूपच स्टायलिश आणि सुंदर दिसते. त्याला तुम्हाला गजरे देखील गुंडाळता येतात. हल्ली अशा काही हेअर ॲसेसरीज मिळतात. त्या केसांना गुंडाळल्या की खूप चांगले दिसतात. त्यामुळे तुम्हाला असे हेअरस्टाईल करता येतात.
- ब्रायडल ब्रेड : ब्रायडल ब्रेड हा प्रकार देखील सध्या खूपच जास्त प्रसिद्ध आहे. ब्रायडल ब्रेड हे थोडे जाड असतात. म्हणजे तुमचे केस पातळ असले तरी देखील यामध्ये ते नक्कीच वेगळे दिसतात. थोडी पसरलेली अशी ही वेणी असल्यामुळे तुम्ही ब्रायडल ब्रेड करून घेऊ शकता. यामध्ये तुम्हाला खरी आणि खोटी अशी दोन्ही फुलं लावता येतात. ज्यामुळे त्याचा लुक अधिक वाढतो. आता केस लांब असो वा शॉर्ट तुम्ही अगदी कोणत्याही केसांवर अशी वेणी हेअरस्टाईल करू शकता.

# पातळ केस कसे दिसतील बाऊन्सी...

घनदाट, मुलायम आणि बाऊन्सी केस हे अनेकांना आवडतात. प्रत्येक महिलेला असे केस हवे असतात. घनदाट आणि बाऊन्सी केस तुमचे सौंदर्य वाढविण्यास अधिक मदत करतात. तसंच तुम्हाला आत्मविश्वास वाढविण्यासही याचा फायदा मिळतो. अनेक महिला या आपल्या फ्लॅट आणि पातळ केसांमुळे अजिबातच विश्वासाने वागत नाहीत. तसंच त्यांना आपले केस आपल्याला अधिक चांगले दिसत नाहीत असं वाटत राहतं. घनदाट केस मिळावे यासाठी महिला काय काय नाही करत. घनदाट केसांसाठी घरगुती उपायांपासून ते अगदी पार्लरमध्ये जाऊन उपचार घेण्यापर्यंत अनेक गोष्टी केल्या जातात. पण तरीही केस घनदाट आणि बाऊन्सी दिसत नाहीत. तुम्हीदेखील पातळ केसांपासून त्रस्त असाल तर तुम्ही या मदतीने तुम्ही केस घनदाट आणि बाऊन्सी दाखवू शकता...

- हेअर स्टायलिंग दरम्यान ब्लो ड्रायचा करा वापर : पातळ केसांची स्टाईलदरम्यान केस स्ट्रेट केल्यास, केस पातळ आणि चपटे असे दिसतात. पातळ केस अधिक घनदाट दाखविण्यासाठी तुम्ही वेव्ही हेअरस्टाईल (Wavy Hairstyle) अथवा कर्ल हेअरस्टाईल (Curl Hairstyle) केल्यास, तुम्ही अधिक स्टायलिश दिसाल. यामुळे केस अधिक घनदाट दिसतात. केसांना स्टाईल करताना ब्लो ड्रायचा तुम्ही वापर करा. ब्लो ड्राय वापर केल्यास, तुमचे केस अधिक घनदाट आणि बाऊन्सी दिसतात. ब्लो ड्रायमुळे तुमचे केस अधिक व्हेवी लुक देतात आणि तुमच्या केसांना अधिक व्हॉल्युमही दिसतो.
- केसांना करा हायलाईट : पातळ केस अधिक घनदाट दाखविण्यासाठी तुम्ही केस अधिक हायलाईट करू शकता. केसांना हायलाईट केल्याने केसांना अधिक व्हॉल्युम दिसतो. केसांना ब्राऊन, कॉफी अथवा कॅरामल रंगाने तुम्ही हायलाईट केल्यास, तुमचे पातळ केस अधिक बाऊन्सी दिसतात आणि त्याशिवाय घनदाट दिसण्याही मदत होते. तसंच तुम्ही अधिक फॅशनेबल आणि आकर्षक दिसता. हायलाईट केसांमुळे तुमच्या केसांच्या पातळपणापेक्षा त्या रंगाकडे अधिक लक्ष वेधलं जातं.



- आपल्या केसांचा भांग बदला : बरेचदा सतत एकाच बाजूचा भांग ठेवल्यास अथवा एकाच प्रकारचा भांग ठेवल्याने केस अधिक पातळ आणि चपटे दिसून येतात. काही महिन्यांनंतर तुम्ही केसांचा भांग बदलत राहायला हवा. केसांना तुम्ही वेगळा भांग पाडल्यास केसांचा व्हॉल्युम दिसून येतो आणि केसांचा पातळपणाही दिसून येत नाही. त्यामुळे काही महिन्यांनंतर तुम्ही केसांचा भांग बदलत राहा.
- बदलत्या ऋतुनुसार शँपू आणि कंडिशनर बदला : पातळ केसांनी तुम्ही त्रस्त असाल तर तुम्ही तुमचा शँपू आणि कंडिशनर योग्य आहे की नाही याची आधी पडताळणी करा. तुम्ही आपला शँपू आणि कंडिशनर बदला. बरेचदा एकच शँपू आणि कंडिनशर वापरल्याने तुमचे केस अधिक पातळ आणि चपटे दिसून येतात. त्यामुळे केस धुतल्यानंतर तुम्ही कंडिशनरचा वापरही करावा. केसांना कंडिशनर लावल्याने केस अधिक मुलायम आणि बाऊन्सी दिसतात. याचा तुम्ही नियमित वापर करावा. खरं तर तोच तोच शँपू सतत वापरू नये. अन्यथा केस कोरडे आणि निस्तेज होतात. मात्र आपण आपल्या केसांसाठी योग्य शँपू आणि कंडिशनर वापरत आहोत की नाही याचीही पडताळणी करून घ्या. पातळ केसांना जर बाऊन्सी दाखवायचे असेल तर तुम्ही या टिप्सचा नक्की वापर करा आणि तुम्हाला तुमच्या केसांमध्ये काही बदल दिसून येत आहे की नाही हे आम्हालादेखील नक्की कळवा.

# थंडीमुळे त्वचेचे पापुद्रे?



हिवाळ्यात वातावरणात वाढलेला कोरडेपणा त्वचा आणि केसांसाठी त्रासदायक ठरतो. हवा कोरडी आणि थंड असल्यामुळे त्वचा कोरडी पडते आणि त्वचेचे पापुद्रे निघू लागतात. बऱ्याचदा थंडीत ओठ, तळहात, नखांच्या जवळपासचा भाग, पायाच्या टाचाजवळच्या त्वचेचे पापुद्रे निघतात. त्वचा सोलली गेल्यामुळे त्या ठिकाणी जळजळ आणि दाह जाणवतो. कधी कधी तर अशा ठिकाणी त्वचेमधून रक्तही वाहू लागते. अशा वेळी कोरडी त्वचा मऊ होण्यासाठी काहीतरी घरगुती उपाय माहीत असायला हवेत. नाहीतर हिवाळा सहन करणे कठीण आणि त्रासदायक होऊ शकतो...

## थंडीत त्वचेवर करा हे उपाय

घरच्या घरी काही उपाय करून तुम्ही तुमच्या त्वचेला मऊ करू शकता. ज्यामुळे त्वचेचे पापुद्रे निघत नाहीत आणि तुम्हाला लवकर आराम मिळतो.

- मध : थंडीमुळे सोललेल्या त्वचेवर मध लावण्यामुळे चांगला आराम मिळू शकतो. कारण मधामुळे त्वचा मऊ होते आणि त्वचेचे पोषण होते. त्वचेला मऊपणा आल्यामुळे थंड हवेचा त्वचेवर परिणाम होत नाही आणि त्वचेचे पापुद्रे निघत नाहीत.
- दूध : दुधामुळेही त्वचेला चांगले पोषण मिळते. ज्यामुळे दुधाचा वापर तुम्ही थंडीत मॉइस्चराइझरसारखा करू शकता. त्वचेला मऊ करण्यासाठी नियमित दूध अथवा दुधाची साय लावा. दूध पिण्यामुळे त्वचेला आतून पोषण मिळते. ज्यामुळे त्वचेचे पापुद्रे निघत नाहीत.
- हायड्रेट राहा : हिवाळ्याप्रमाणेच थंडीतही डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो. कारण हिवाळ्यात पाणी कमी पिले जाते. यासाठी हिवाळ्यात जाणिवपूर्वक हायड्रेट राहण्याचा प्रयत्न करा. नियमित भरपूर पाणी प्या. पाणी पिण्याने जास्त थंडी वाजत असेल तर थोड्या वेळाने सतत कोमट पाणी प्या. ज्यामुळे थंडीचा त्रासही कमी होईल. या काळात गरम सूप पिण्याने शरीराला पुरेसे पाणी मिळू शकते.
- पेट्रोलियम जेली : थंडीत त्वचेचे पापुद्रे निघत असतील तर त्यावर उत्तम उपाय म्हणजे त्वचेवर पेट्रोलिअम जेली लावणे. कारण या जेलीमध्ये लोणी असतं. ज्यामुळे त्वचा मऊ होतेच शिवाय त्वचेचं योग्य पोषणही होतं. रात्री झोपताना त्वचेवर पेट्रोलियम जेली लावल्यास चांगला फायदा होतो.
- कोरफड : थंडीपासून त्वचेचं रक्षण करण्याचा आणखी एक उपाय म्हणजे त्वचेवर कोरफडाचा गर लावणे. कोरफड त्वचेसाठी पोषक असल्यामुळे हा गर लावण्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या कमी होतात आणि त्वचेचा कोरडेपणा कमी होतो.

# विंटर फॅशन एक्सेसरीजने दिसा जास्त स्टायलिश

हिवाळा आला की सर्वांनाच स्वेटर, जॅकेट आणि स्टोलसारखे कपडे घालावे लागतात. अशा जाड आणि आणि बोरींग कपड्यामुळे स्टाइलिश कपडे आणि एक्सेसरीज वॉर्डरोबमध्ये कैद होतात. थोडक्यात हिवाळ्यात कोणती स्टाईल कॅरी करावी हा प्रश्न अनेकांना पडतो. त्यामुळे हिवाळा फारसा कोणाला आवडत नाही. मात्र हिवाळा देखील तुम्हाला स्टाइलिश दिसण्यासाठी नक्कीच फायद्याचा ठरू शकतो. हिवाळ्यात स्टायलिश दिसण्यासाठी तुम्ही या ॲक्सेसरीज खरेदी करू शकता.

- पॉम पॉम हॅट : हिवाळ्यात स्वेटर, लेदर जॅकेट अथवा फर जॅकेट तुमच्या लुकमध्ये एक छान बदल आणतात. मात्र त्यासोबत तुमच्याजवळ जर पॉम पॉम हॅट असेल तर तुमचा लुक अगदी परफेक्ट दिसेल. तुम्ही एखाद्या छान स्वेटशर्ट अथवा स्टोलसोबतही ही टोपी कॅरी करू शकता. या हॅटमुळे तुमच्या डोक्याचे थंडीपासून संरक्षण होईलच शिवाय तुमचा लुकपण हटके दिसेल.
- रंगबिरंगी स्कार्फ : स्कार्फ अथवा स्टोल हिवाळ्यात तुमचं थंडीपासून बचाव करण्यास मदत करतात. मात्र एवढंच नाही तर एखाद्या छानशा रंगीत स्टोल अथवा स्कार्फमुळे तुमच्या लुकमध्येही छान चेंज होतो. आजकाल गडद रंगाचे अथवा मल्टी कलर स्कार्फ बाजारात सहज मिळतात. तुम्ही कोणत्याही ड्रेस अथवा वेस्टर्न आऊटफिटसोबत ते मॅच करू शकता.
- लेग वार्मर : हिवाळा आला की तुमचे शॉर्ट ड्रेस तुम्ही बाजूला काढून ठेवता आणि जीन्स अथवा लाँग ड्रेस घालणं सोयीचं समजता. पण एखाद्या पार्टीसाठी अथवा वेकेशनवर असताना तुम्हाला शॉर्ट ड्रेस घालायचा असेल तर तुम्ही त्यासोबत लेग वॉर्मर घालू शकता. कारण त्यामुळे तुमच्या पायाला थंडी वाजत नाही आणि तुम्ही स्टायलिश दिसता.
- इअर मफ : आजकाल तुम्हाला कुठेही आकर्षक इअर मफ विकत मिळतात. कानात थंडी भरली तर तुम्हाला जास्त थंडी लागते. यासाठी कानाचे थंडीपासून संरक्षण करणं गरजेचं असतं. इअर मफमुळे तुमच्या कानाला थंडी लागत नाही. प्रवासात थंडीपासून बचाव करण्यासाठी तुम्ही एअर मफ वापरू शकता. विशेष म्हणजे त्यामुळे तुम्हाला एक छान कोझी लुक मिळतो.
- हँड ग्लोव्ज : हात थंडीपासून वाचावेत यासाठी तुम्ही लोकरीचे ग्लोव्ज हातात घालू शकता. आजकाल अनेक स्टायलिश ग्लोव्ज बाजारात मिळतात. हे ग्लोव्ज तुमच्या हाताचे थंडीपासून संरक्षण करतातच शिवाय त्यामुळे तुम्ही स्टायलिशही दिसू शकता.

# फेब्रुवारीमध्ये जागतिक स्तरावरील 'मुंबई क्लायमेट वीक'चे मुंबईत आयोजन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



**मुंबई**–वातावरणीय बदल आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात भारताचे नेतृत्व अधोरेखित करणारी मुंबई वातावरण सप्ताह – 'मुंबई क्लायमेट वीक' ही जागतिक स्तरावरील परिषद पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मुंबईत होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

हा महत्त्वाकांक्षी उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या संस्थेच्या संकल्पनेतून साकारला जात असून महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाची घोषणा केली. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, विभागाच्या सचिव जयश्री भोज, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी आदी उपस्थित होते.

विकसनशील देशांतील वातावरणीय बदल, अन्न व ऊर्जा टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून विकास आणि पर्यावरणीय कृती यांच्यात संतुलन साधण्यासाठी तो प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई क्लायमेट वीकचा मुख्य कार्यक्रम १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडेल. त्याचबरोबर या कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता यावे, यासाठी शहरभर विविध प्रदर्शने, कार्यशाळा, चित्रपट, कला, क्रीडा, आरोग्य आणि अध्यात्म यांच्याशी निगडीत उपक्रम, आणि क्लायमेट फुड फेस्टिव्हल सारखे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या परिषदेत ग्लोबल साऊथमधील ३० पेक्षा अधिक देशांमधील प्रतिनिधी सहभागी होणार असून यामध्ये व्यवहार्य असा हवामान बदल कृती कार्यक्रम तयार करण्यात येईल. विशेष म्हणजे हा कार्यक्रम राज्यांचे मुख्यमंत्री, विविध शहरांचे प्रतिनिधी, उद्योग, सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि युवक यांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. यावेळी फडणवीस यांच्या हस्ते मुंबई क्लायमेट विकच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या उपक्रमाची चित्रफीत यावेळी दाखविण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हवामान सप्ताह कृतीसह नेतृत्व करण्याच्या भारताच्या दृढनिश्चयाचे प्रदर्शन करतो. माननीय पंतप्रधानांनी ठरवलेल्या दृष्टिकोनातून प्रेरित होऊन, मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक दक्षिणेसाठी न्याय्य, नाविन्यपूर्ण, चांगल्या निधीसह हवामान भविष्य घडवण्यास मदत करण्यास तयार आहेत.

ग्लोबल साउथमधील वातावरणीय कृती आणि सहकार्य या क्षेत्रामधील भारताचे नेतृत्व सिद्ध करणारे मुंबई क्लायमेट वीक हे मोठे व्यासपीठ ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईत पहिल्यांदाच मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. आता कृती करण्याची वेळ आली आहे.

यासाठी आपण समाजातील प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक व्यवसायाला आणि जीवनाच्या सर्व स्तरांना हवामान बदलाच्या परिणामांविरुद्ध मोहिमेत सहभागी व्हावे लागणार आहे. तसेच त्यांना कृतींद्वारे बदल कसे कमी करायचे हे प्रत्यक्षात सांगावे लागणार आहे.

मुंबई क्लायमेट वीक कार्यक्रम आयोजित केल्यानंतर आपल्याला महाराष्ट्र आणि मुंबईसाठी बेंचमार्क देखील निश्चित करावे लागतील, हवामान बदलाच्या क्षेत्रात कृती करण्यासाठी काही ध्येये निश्चित करावी लागतील. त्यासाठी आजपासून कृती सुरू करूया असेही ते म्हणाले.

तीसहून अधिक देशांमधील अभ्यासक, पर्यावरण तज्ज्ञ, आणि धोरणकर्ते मुंबई क्लायमेट वीकच्या व्यासपीठावर एकत्र येऊन वातावरणीय बदलावरच्या सर्वंकष आणि व्यवहार्य उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न करतील. हा उपक्रम भारत आणि विकसनशील राष्ट्रांचा आवाज जागतिक स्तरावर पोहोचविणारा ठरेल, असेही ते म्हणाले.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभाच्या उपक्रमांचा शुभारंभ

## राज्यातील २१ जिल्ह्यांतील ७,२०१ हून अधिक गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी होणार

**मुंबई**–हवामान बदलाचे अनेक परिणाम राज्यातील शेती–वर होत असून शेतकरी वर्गाला मोठा फटका बसत आहे. अशा परिस्थितीत बदलत्या हवामानाला तोंड देत शेती अधिक किफायतशीर करण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करणे गरजेचे असल्याचे महाराष्ट्र शासनाने जागतिक बँकेच्या सहकार्याने कृषी विभागाच्या माध्यमातून हवामान अनुकूल शेती विकासाचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आणि शेतकरी गटांना लाभ देण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या डीबीटी प्रणालीचे अनावरण करून प्रकल्पातील उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ,वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योगमंत्री उदय सामंत, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल,मुख्य सचिव राजेशकुमार, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंह आणि प्रकल्प कार्यालयातील तसेच मंत्रालयीन अधिकारी उपस्थित होते.

वेगाने होत असलेल्या हवामान बदलामुळे राज्यातील शेतीवर प्रतिकूल परिणाम होत असून पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. राज्यातील ८२ % जमीन कोरडवाहू असल्यामुळे पिकांच्या वाढीच्या अवस्थेत पडणारा पावसातील खंड पिकांच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम करतो. त्याबरोबरच अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतीचे आणि पिकांचे मोठे नुकसान होते. या सगळ्याचा फटका सर्वच शेतकऱ्यांना आणि विशेषतः अल्प व अत्यल्प भूधारकांना सहन करावा लागतो. वाढते तापमान, अनियमित पाऊस, तीव्र टंचाई, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि दिवसेंदिवस कमी होत असलेली जमीनधारणा यामुळे शेतीमधील जोखीम वाढली आहे. अशा प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी सामना करण्यासाठी शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढविण्याबरोबरच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे अत्यावश्यक झाले आहे.


### टी. सी. हरवली आहे

माझी साहेब आनंदा आऊलवाड या नावाची इयत्ता सातवीत शिकत असलेली टी. सी. नांदेड ते हंगरगा दरम्यान बसने प्रवास खरीत असतांना हरवली आहे. कोणाला सापडल्यास आणून द्यावे. **संपर्काचा पत्ता**– मु. हंगरगा, पो. बोळसा, ता. उमरी, जि. नांदेड.

मो. ९०४९९६५०९१


# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास ६ महिन्यांची मुदत मिळणार

**मुंबई** – राज्यातील महापालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरींसाठी तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीत राखीव जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत मिळणार आहे. याबाबतच्या अधिनियमात सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार आता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येईल. तसेच तत्पूर्वी त्याबाबतचा अध्यादेश काढण्यात येईल.

तर ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदीत सुधारणा करण्यात येईल.

या अनुषंगानेही महाराष्ट्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत देणे, अध्यादेश २०२५ काढण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही दोन्ही अध्यादेश राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने काढण्यात येणार आहेत.

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा राज्यातील २४ विद्यापीठांच्या कुलगुरुंशी संवाद

**मुंबई**–महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंशी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला.

विद्यार्थ्यांना केवळ अक्षरज्ञान व पदवी देणे इतकेच कर्तव्य नसून विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना कौशल्य ज्ञान द्यावे, उद्यमशील बनवावे तसेच विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी त्यांना जबाबदार नागरिक घडवावे अशी सूचना राज्यपालांनी कुलगुरूंशी साधलेल्या पहिल्या संवादात केली. संवाद सत्राला राज्यातील सर्व २४ अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु तसेच निवडक विभागांचे सचिव उपस्थित होते.

विद्यापीठांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची पूर्ण प्रामाणिकपणे अंमलबजावणी करावी तसेच विद्यापीठांचे राष्ट्रीय गुणांकन सुधारावे अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. महाराष्ट्र हे शैक्षणिक दृष्ट्या प्रगत राज्य आहे. आज आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमुळे स्पर्धा वाढत असताना आपल्या विद्यापीठांचे गुणांकन घसरत आहे ही चिंतेची बाब आहे असे सांगून विद्यापीठांनी या संदर्भात पावले उचलावी असे राज्यपालांनी सांगितले.

विद्यापीठांनी दर तीन महिन्यांना केलेल्या कार्याचा अहवाल राजभवनाला पाठवावा अशी महत्वाची सूचना राज्यपाल देवव्रत यांनी यावेळी कुलगुरुंना केली. अह–वालामध्ये विद्यापीठांनी आपल्या अडचणी – समस्या देखील मांडाव्या असे त्यांनी सांगितले.

युवक – विद्यार्थी खेळले नाही, मैदानावर गेले नाही व घाम गाळून आपल्या ऊर्जेचा सदुपयोग केला नाही तर त्या ऊर्जेचा ते निश्चितच दुरुपयोग करतील असे सांगून विद्यापीठ – महाविद्यालयांनी आपली क्रीडांगणे व इतर क्रीडा सुविधा सुस्थितीत ठेवाव्या, क्रीडा विभाग बळकट करावे तसेच किती विद्यार्थी खेळावयास जातात व क्रीडा सुविधांचा उपयोग करतात या गोष्टींकडे लक्ष ठेवावे असे त्यांनी सांगितले. याबाबतचा कार्यअहवाल विद्यापीठांनी राजभवनाला पुढील तीन महिन्यात द्यावा अशी सूचना त्यांनी केली.


### जाहीर नोटीसला जाहीर आक्षेप

माझे पक्षकार नामे १) संभाजी पि. महाजन पांचाळ, २) मारोती पि. महाजन पांचाळ दोघे रा. हातनी पो. बळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालीलप्रमाणे आक्षेप घेत आहे.

१) हे की, माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून खालीलप्रमाणे श्री नारायण नागोराव पांचाळ व धोंडीबा नागोराव पांचाळ यांनी ॲड. मठपती यांच्यामार्फत दैनिक पेपरमध्ये माझे पक्षकार नामे १) संभाजी पि. महाजन पांचाळ, २) मारोती पि. महाजन पांचाळ यांच्या मालकी हक्काच्या सर्वे क्र. ३३ मधील व सर्वे क्र. ५३ मधील शेत जमिनीबद्दल त्रयस्थ व्यक्तीने सौदाचिट्ठी, गहाणपत्र व इतर कोणत्याही स्वरूपाचा विक्री व्यवहार करू नये अशी जाहीर नोटीस दिली आहे.

२) हे की, या संबंधाने माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीनुसार वरील जाहीर नोटीसमध्ये दिलेले दोन्हीही सर्वे क्रमांकांपैकी कोणत्याही सर्वे नं. पैकी सर्वे नं. ३३ व सर्वे नं. ५३ या क्रमांकाच्या सर्वे नंबरबद्दल दावा दाखल नसून केवळ सर्वे क्र.३३/२ मधील क्षेत्रफळ १ हे १७ आर या जमिनीतील काही हिस्सा क्षेत्र याचा दावा केला असून, वरील जाहीर प्रगटनात लिहिलेले क्षेत्र २२ एकर ३५ गुंठे व २२ एकर ३७ गुंठे याबद्दल कुठलाही दावा कोर्टामध्ये दाखल केलेला नाही करिता या खोट्या जाहीर नोटीसला माझे पक्षकाराचा घोर आक्षेप आहे.

करिता जाहीर नोटीसला जाहीर आक्षेप आहे याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

मार्फत
ॲड. एम. ए. चिकटवाड
मो. ९३७०६५०३४६

जाहीर आक्षेप घेणार
१. संभाजी पि. महाजन पांचाळ
२. मारोती पि. महाजन पांचाळ
दोघे रा. हातणी, पो. बळेगाव,
ता. उमरी, जि. नांदेड


# यंदा कर्तव्य असणाऱ्यांसाठी नोव्हेंबरपासून जूनपर्यंत तब्बल ६८ विवाह मुहूर्त

**ठाणे (प्रतिनिधी)** – तुळशी विवाहानंतर लग्नसराईचा धडाका सुरू होतो. यंदा नोव्हेंबरपासून जूनअखेरपर्यंत तब्बल ६८ विवाह मुहूर्त आहेत. वैदिक परंपरेनुसार आषाढ महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी (देवशपनी) ते कार्तिक शुक्ल एकादशीपर्यंत चातुर्मास पाळला जातो. वावर्षी भागवत एकादशी २ नोव्हेंबरला आहे. द्वादशीला श्रीकृष्ण यांच्याशी तुळशीचा विवाह लावण्यात येतो. तेव्हापासून वैवाहिक मुहूर्त काढले जाण्याची परंपरा आहे. यावर्षी तुळशीचा विवाह कार्तिक शुक्ल द्वादशी बुधवार, २ नोव्हेंबरपासून, कार्तिक

पौर्णिमा शुक्रवार, ५ नोव्हेंबरपर्यंत करावयाचा आहे. त्यानंतर माणसांच्या विवाह सोहळ्यांना प्रारंभहोईल. डिसेंबर २०२५ मध्ये लग्नासाठी ४, ५ आणि ६ डिसेंबर या तीन शुभ



तारखा आहेत. जानेवारी २०२६ या महिन्यात शुक्र ग्रहाच्या दहनामुळे आणि इतर प्रतिकूल घटकांमुळे लग्नासाठी शुभ मुहूर्त नाही. त्यामुळे, लग्न करण्यासाठी हा काळ शुभ नाही. फेब्रुवारी २०२६ मध्ये ५, ६, ८, १०, १२, १४, १९, २०, २१, २४, २५ आणि २६ या दिवशी विवाह मुहूर्त आहेत. मार्च हा एक संक्रमणकालीन महिना म्हणून ओळखला जातो, जो उबदार वसंत ऋतूचे स्वागत करतो आणि हिवाळ्याला निरोप देतो.

मार्च २०२६ मध्ये २, ३, ४, ७, ८, ११, १२ रोजी विवाह मुहूर्त आहेत. एप्रिल हा फुलांचा महिना, जेव्हा वसंत ऋतू त्याच्या शिखरावर असतो. या महिन्यात १५, २०, २१, २५, २७, २८ आणि २९ तारखेला विवाह मुहूर्त आहेत. मे २०२६ मध्ये हिंदू पंचांगामध्ये लग्नासाठी ८ शुभमुहूर्त आहेत. त्यात १, ३, ५, ६, ७, ८, १३ आणि १४ मे २०२६ या तारखांचा समावेश आहे. जून २०२६ महिन्यात २१, २२, २३, २४, २५, २६, २७ आणि २९ जून २०२६ या ८ तारखांना लग्नाचे मुहूर्त असल्याचे हिंदू पंचांगामध्ये नोंद आहे.


### महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड**

**ई– निविदा सूचना क्र. १३ सन २०२५–२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि. नांदेड (दूरध्वनी क्रमांक ०२४६७– २२२६५८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून नांदेड जिल्ह्यातील एकूण ४५ कामांकरीता बी–१ नमुन्यातील ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे.

टीप– १) निविदा कागदपत्राचा तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई–टेंडरींग संकेतस्थळ https://mahatendern.gov.in/ आणि www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर जि.नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर
जि. नांदेड



### Change In Name

My old name is SMITA NIVRUTTI KOLNURE here by declare that I have changed my new name SMITA NIWRATTI KOLNURE hence forth hear all correspondence will be done as per the new name, please consider the same. **Address:** RENUKA NIWAS, KAILASH NANDED-431603

Mo. No. 9011944537

### Change In Name

My old name is SHRIPAD CHANDRAKANT KULKARNI here by declare that I have changed my new name SHRIPAD CHANDRAKANTRAO KULKARNI hence forth hear all correspondence will be done as per the new name, please consider the same. **Address:** CHANDRAKANTRAO KULKARNI, LOKMANGAL NAGAR, SELU-431503

Mo. No. 9420725959

### Change In Name

My old name is RAHANA BEGUM SHAIKH AHMAD here by declare that I have changed my new name REHANA MUBEEN KHAN hence forth hear all correspondence will be done as per the new name, please consider the same. **Address:** IQBAL NAGAR EIDGAH ROAD KHUDWAI NAGAR CHAORASTA, ITWARA, NANDED MAHARASHTRA-431604

Mo. No. 9860364730



### टी. सी. हरवली आहे

कु. लक्ष्मीबाई रामलू शमदरे या नावाची टि सी श्री संगमेश्वर विद्यालय बडूर या शाळेची आठवी पास टि सी बिलोली ते नांदेड बसने प्रवास खरीत असतांना टिसी हारवली आहे. कोन्हाला सापडल्यास आणून द्यावे

संपर्काचा पत्ता–कु. लक्ष्मीबाई रामलू शमदरे, मु. पो. बडूर ता. बिलोली जि. नांदेड मो.९०८२३९१४८०



### जाहीर प्रगटन

तालुका कार्यकारी दंडाधिकारी, भोकर यांचे न्यायालयात
जन्म नोंदणी सुधारणा कायदा–२०२३ मध्ये कलम ११(३) अन्वये
अर्ज क्रं. १३८
श्री संजय फुलसिंग राठोड रा. जांभळी ता. भोकर जि. नांदेड
विरुध्द
जन्म, मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी जांभळी ता. भोकर

विषय – जन्म–मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज गोविंदराज संजय राठोड यांच्या जन्माची नोंद घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार श्री संजय फुलसिंग राठोड रा. जांभळी, ता. भोकर जि. नांदेड यांनी त्यांचा मुलगा नामे गोविंदराज संजय राठोड याचा जन्म दिनांक ०७/०४/२००९ रोजी जांभळी ता.भोकर येथे झाला असून, सदर जन्माची नोंद जन्म –मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२३ च्या कलम ११ (२) व (३) अन्वये घेण्याकरिता जन्म– मृत्यू नोंदणी निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी जांभळी ता. भोकर यांना आदेशीत करण्यासाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी गोविंदराज संजय राठोड यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय जांभळी ता. भोकर येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा नामे गोविंदराज संजय राठोड यांचा जन्म दिनांक ०७/०४/२००९ रोजीच्या जन्माची नोंद घेण्याविषयी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांमध्ये या कार्यालयात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित मुदतीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

तालुका दंडाधिकारी,
भोकर



जा. क्र. ५२२०/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड
दिनांक–२८/१०/२०२५

### चौकशीची जाहीर नोटीस

एसआरएन क्रमांक–NND/00278/1860/25
फेरफार अहवाल अर्ज क्र....
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक वै. गुरुवर्य अनंत महाराज भारती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था राहाटी ता. जि. नांदेड
न्यासाचा पत्ता–हाऊस नं. ३३५/२ पो. राहाटी, ता. जि. नांदेड
अर्जदार–उद्धव अनंतबुवा भारती.

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

| अनुक्रमांक | तपशील | अंदाजे मूल्ये |
|---|---|---|
| 1. | MEMBERSHIP FEES | 1057.00 |

अ) जंगम मिळकत रोख रुपये –१०५७ मात्र
अक्षरी रुपये एक हजार सत्तावन्न रुपये मात्र, फक्त.

स्थावर मिळकत वर्णन :

| अ. क्र. | शहर किंवा गाव | सी.एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्व्हेक्षण क्रमांक | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | -- | | | |

ब. स्थावर मिळकत– रोख रुपये मात्र अक्षरी रुपये मात्र

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्यानिशी आज दिनांक १५–१०–२०२५ रोजी दिली.

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नांदेड विभाग, नांदेड



### जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १९९/२५
चंद्रकला व इत्तर विरुध्द निरंक

अर्जदार–१. चंद्रकला भ्र. नागनाथ अदमनकर वय ६५ वर्षे, २. संध्या पि. नागनाथ अदमनकर वय ४१ वर्षे, ३. गीता पि. नागनाथ अदमनकर वय ३९ वर्षे, ४. अनिता पि. नागनाथ अदमनकर वय ३७ वर्षे, ५. साईनाथ पि. नागनाथ अदमनकर वय ३५ वर्षे, ६. वैजनाथ पि. नागनाथ अदमनकर वय ३२ वर्षे, ७. माधुरी पि. नागनाथ अदमनकर वय २८ वर्षे, सर्व रा. बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड
विरुद्ध
निरंक
विषय–वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असून त्यात असे कथन केले आहे की, मयत नागनाथ पि. मल्हारी अदमनकर यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी असून, अर्जदार क्र. २, ४ व ७ ह्या मुली आहेत. आणि अर्जदार क्र. ५ व ६ ही मुले आहेत. अर्जदार हे मौ. बिलोली, ता. बिलोली जि. नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत नागनाथ पि. मल्हारी अदमनकर यांचा मृत्यू दिनांक २१/०६/२०२५ रोजी पोटाच्या त्रासामुळे व वृद्धापकाळामुळे मौ. बिलोली येथे झाला. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत नागनाथ पि. मल्हारी अदमनकर यांचे कायदेशिर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक १/१२/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली



### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित राष्ट्रवादी युवकच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष रऊफ जमिनदार यांच्यावतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जोपासली.



शहरातील देगलूर नाका येथील हैदर पेट्रोल पंप येथे दि. २९ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. या कार्यक्रमास माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, बालासाहेब मादसवाड, फैसल सिद्दीकी, अॅड. प्रमोद नरवाडे, निखील नाईक, मोहम्मदी पटेल, जब्बार मौलाना, पंकज कांबळे, सरफराज अहेमद, अतिक बिल्डर, सुफी तौफिक कादरी, अरशद कादरी, अब्दुल जब्बार, शेख युसूफ, अब्दुल सत्तार, मोहम्मद इमरान, जलाल शेख, शेख पाशा, शेख इमरान, हाजी खान, रहीम खान, सरदार शाह मिराशा, कामरान खान, रवी बिल्डर, कृष्णा खर्वे, मोहम्मद इरफान, कृष्णा पाटील गिरी, शेख निसार, जब्बार पठाण, जब्बार हाफीज, शेख जावेद, इमरान बागवान, रणजीत दवणे, शेख सत्तार, मोहम्मद इमरान, मोहम्मद अकरम, आवेद मोहम्मद, शेख वसीम, मोहम्मद मुजीब, अमित सुखमनी, सुरज कदम, मो. आरसलान, मोहम्मद गौस, साहील खान, अल्ताफ राजा, सय्यद अजहर, साजीद शेख, मोहसीन खान, मतीन खान, हाफीज इब्राहिम, खाजा भाई, आरेफ खान, प्रकाश कदम, मोईन खान, कदीर कुरेशी, मोहम्मद शफी, लेबर ऑफिसर यास्मीन शेख, आशिया परवीन, जैसिका शिंदे, तरुनम सय्यद, नईम खान आदींची उपस्थिती होती.

## 'ऑपरेशन फ्लश आऊट' अंतर्गत रामतीर्थ पोलिसांची कारवाई

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या दोन गुन्हेगारांना धारधार शस्त्रांसह अटक; दोन वाहनांसह १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या ऑपरेशन फ्लश आऊट मोहिमेअंतर्गत रामतीर्थ पोलिसांनी कारवाई करत दोन संशयित गुन्हेगारांना फिल्मी स्टाईलने पकडण्यात यश मिळवले आहे. या दोघांकडून धारदार हत्यारे, दोन वाहने व मोबाईलसह १० लाख २१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत रामतीर्थ पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे व देगलूर पोलीस ठाण्याचे पोनि मारोती मुंडे हे त्यांच्या पथकासह गस्तीदरम्यान असताना खात्रीशीर माहिती मिळाली की, पांढरी पिकअप व डिझायर कारमधून काही संशयित शस्त्रांसह देगलूरहून नरसीकडे निघाले असून, ते दरोड्याचा गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत आहेत.

त्यानुसार दोन्ही अधिकाऱ्यांनी तत्काळ आपले पथक तयार करून वाहनांचा पाठलाग केला. दि.२९ ऑक्टोबर रोजी पहाटे ४ वाजता मौजे डोणगाव (खु.) शिवारात संशयित वाहनांना थांबवण्यात आले. तपासाअंती कर्तारसिंग हत्यारसिंग टाक (रा. इंद्रानगर, कळमनुरी, जि. हिंगोली) व सूर्यकांत रामराव कुगावकर (रा. माळेगाव, ता. कळमनुरी, जि. हिंगोली) असे दोघे



संशयित पकडले गेले, तर इतर तीन जण अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

झडतीदरम्यान धारदार तलवार, चाकू, लोखंडी पाईप, स्टील रॉड, मोबाईल फोन, तसेच दोन वाहने बोलेरो पिकअप व डिझायर कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात आरोपी हे हिंगोली जिल्ह्यातून नांदेड जिल्ह्यात दरोडा घालण्यासाठी आले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी पोलीस ठाणे रामतीर्थ येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना अटक करून पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे. या धाडसी कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे व देगलूर पोलीस ठाण्याचे पो. नि. मारोती मुंडे व अंमलदारांचे कौतुक केले.

# आष्टुर येथे विजेचा शॉक लागून तरुणाचा दुर्देवी मृत्यू

**लोहा (प्रतिनिधी)** – तालुक्यातील आष्टुर



येथील शिवारात बैल आणण्यासाठी गेलेल्या २६ वर्षीय तरुणाच्या पायाला शेतातील अंथरलेल्या वीज वाहक तारेचा स्पर्श झाल्याने सदर तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

फुल हार विकून कुटुंबाची गुजराण करणारा सुनील महालिंग फुलारी (वय २६) रा. आष्टुर हा तरुण दैनंदिन देवपूजा करण्यासाठी गाव परिसरातील बेल, फुल आणून पूजा करायचा. नित्यनियमाप्रमाणे सुनील फुलारी हा बुधवार, दि. २९ रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास गाव शिवारातील जायभाये यांच्या शेतातील बेल वृक्षांची पाने पूजेसाठी आणण्यास गेला होता. त्याच्या सोबत त्याची चुलती चित्राबाई अमृत फुलारी ह्या देखील काही अंतराने होत्या. सदरील बेल झाडा नजीक कापसाच्या शेतातून जात असताना सुनील फुलारी या तरुणाच्या पायास शेतातील पिकांचा वन्य जीवापासून संरक्षण करण्यासाठी अंथरलेल्या वीज भार वाहक तारेस स्पर्श झाल्याने तो जागीच मृत्यू पावला. तो जमिनीवर कोसळल्याचा जोरदार आवाज आल्याने चुलतीने सदरील दिशेने जाऊन पाहिले असता सुनील फुलारी हा निपचित अवस्थेत पडलेला आढळून आला.

सदर घटनेप्रकरणी माळाकोळी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. प्रेताचे शवविच्छेदन करण्यासाठी शव लोहा उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते. याप्रकरणी वृत्त लिहीपर्यंत माळाकोळी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. मयत सुनील फुलारी हा आई सोबत अन्य दोन चुलत्यांचा पोषणकर्ता होता. त्याच्या निधनाने गावात हळहळ होत आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठात 'एकात्म मानव दर्शन' परिसंवादाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – युवा पिढीला एकात्म मानव दर्शनाच्या लोक कल्याणकारी विचारांची प्रेरणा मिळावी, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या 'एकात्म मानव दर्शन' या तत्त्वज्ञानावर आधारित एका दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे/परिसंवादाचे आयोजन दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात करण्यात आले आहे.

या परिसंवादात पद्मश्री भिक्खु रामजी इदाते आणि प्रा. डॉ. राम मंठाळकर हे तज्ज्ञ साधन व्यक्ती म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे अध्यक्षस्थानी असतील. तसेच प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन व सर्व विद्यापीठ प्राधिकरण सदस्य यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सर्वांना उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव प्रा. डॉ. डी. डी. पवार, शिक्षणशास्त्र संकुल संचालिका प्रा. डॉ. वैजयंता पाटील आणि समन्वयक प्रा. डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांनी केले आहे.

# किनवट बाजार समितीला सोयाबीन खरेदीची परवानगी द्या -आ. केराम

**किनवट (प्रतिनिधी)** – जाचक अटी रद्द करून किनवट येथील क वर्गीय कृषी उत्पन्न बाजार समितीला सोयाबीन खरेदीची परवानगी द्या, अशी मागणी आ. भीमराव केराम यांनी पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे प्रत्यक्ष भेटीतून केली आहे.

यासंदर्भात आ. केराम यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आदिवासीबहुल किनवट-माहूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टीच्या तडाख्यातून वाचलेले सोयाबीन शासनमान्य खरेदी केंद्र सुरू न झाल्याने व्यापाऱ्यांकडून सोयाबीन कवडीमोल दरात खरेदी केला जात आहे. किनवट बाजार समिती ही 'क' वर्गातील असून, मागील तीन वर्षांतील तीन कोटी रुपयांच्या उलाढालीची अट असल्याने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास अडचण निर्माण झाली आहे. तथापि, समितीने यापूर्वी सन २०१७ पासून



हमीभाव खरेदी केंद्र यशस्वीरित्या चालवले असून, २०२४ – २५ मध्ये तब्बल ३२ हजार ४२६ क्विंटल सोयाबीन शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात आले होते.

शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या आर्थिक पिळवणुकीपासून वाचवण्यासाठी आणि हमीभावाने त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळावा, यासाठी सदर उलाढालीची अट शिथिल करून किनवट बाजार समितीस तत्काळ खरेदी केंद्र सुरू करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी आ. केराम यांनी मागणी केली आहे.

# चिमणाजी महाबळे यांचे निधन

**लोहा (प्रतिनिधी)** – जुना



लोहा शहरातील कलाल पेठ भागातील ज्येष्ठ नागरिक चिमणाजी लक्ष्मण महाबळे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर लोहा येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, पाच मुली, सुना, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे.

# इच्छित उमेदवारी नायगाव तालुक्यातील; अर्ज देगलूरच्या आमदाराकडे!



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – लोहगाव जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रावण पाटील भिलवंडे यांनी बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी आमदार जितेश अंतापूरकर यांच्या उपस्थितीत पक्षश्रेष्ठींकडे उमेदवारी मागणीचा अर्ज दाखल केला.

नायगाव विधानसभा मतदारसंघात भाजपचेच राजेश पवार हे आमदार आहेत. असे असताना मतदार संघाच्या आमदारांकडे उमेदवारी मागणीचा अर्ज न करता शेजारील मतदारसंघाच्या आमदारांकडे उमेदवारी मागणीचा अर्ज केल्याने हा चर्चेचा विषय बनला आहे. निवडणुकीपूर्वीच सुरू झालेली ही धुसफूस थांबणार की वाढणार याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्षपदी हणमंतराव नटुरे



**मुदखेड (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नांदेड उत्तर विभागातील मुदखेड तालुका अध्यक्षपदी हणमंतराव नटुरे पाटील यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नियुक्ती पत्र देण्यात आले.

हणमंतराव नटुरे यांनी पक्ष संघटनेत उत्कृष्ट काम करून पक्षश्रेष्ठीचा विश्वास संपादन केला असून, त्यांना राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्ष पदाची संधी देण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पंचायत समिती जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही निवड महत्वपूर्ण मानली जात आहे. हणमंतराव नटुरे यांच्या निवडीबद्दल मित्र परिवाराकडून अभिनंदन केले जात आहे.

**पान १ वरून...**

**आर.एस.एस. विरोधी सोशल...**

बेल्टने साईप्रसादने मारहाण करत त्या युवकाला छत्रपती शिवाजी महाराज पुतळा उमरी मोंढा येथे नेले. त्यावेळी स्वप्नील साईप्रसाद सलगरे, रवी सोळंके, कमल जैयस्वाल, श्रेय इरलेवाड हे सोबत होते. माझ्या गळ्यात बेल्ट टाकून ओढत असताना माझा भाऊ संघर्ष बळी लांडगे हा मला सोडविण्यास आला असता रवी सोळंकेने त्याच्या डाव्या हाताला सिगरेटचे चटके दिले. आम्ही सर्व परत गावी आलोत आणि घडलेला प्रकार वडिलांना सांगून तक्रार दिली असल्याचे म्हटले आहे.

या प्रकरणी उमरी पोलिसांनी बेकायद्याची मंडळी जमवणे, मारहाण करणे यासोबत अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमानुसार सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे, जातीचा उल्लेख करणे आदी सदरांखाली गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपअधीक्षक करत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अल्पवयीन बालकाने दिलेल्या फिर्यादीतील पाच आरोपींना उमरी पोलिसांनी अटक केली आहे.

**शेतकरी कर्जमाफीसह विविध...**

पोलीस अधिकाऱ्यांनी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत ठिय्या आंदोलन सुरू असलेली जागा मोकळी करण्याची प्रक्रिया सुरू करावी, असेही आदेशात म्हटले आहे. तसेच नागपूरच्या पोलीस आयुक्तांनी आदेशाची पूर्तता केल्यासंदर्भातील रिपोर्ट उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत सादर करावा असेही न्यायालयाने म्हटले आहे. संबंधित क्षेत्राचे पोलीस अधिकारी तसेच महामार्ग पोलिसांनी आदेशाची पूर्तता करावी, असेही न्यायालयाने त्यांच्या निर्देशात म्हटले आहे.

## नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कारभाराच्या निषेधार्थ

# खेळाडू-पालक समन्वय समितीची निदर्शने

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने १४ वर्षाखालील मुलांचे क्रिकेट निवड चाचणी सामने श्री गुरु गोबिंदसिंघजी स्टेडियम नांदेड येथे घेण्यात आले आहेत. या निवड चाचणीत पारदर्शकता नसून निवड समितीकडून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या नियमावलीनुसार मॅचेस घेण्यात आला नसल्याचा आरोप खेळाडू आणि पालकांनी केला आहे.

नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने खेळाडूंची प्राथमिक चाचणी घेऊन त्यातून खेळाडूंची छाननी करून दोन दिवसीय टेस्ट मॅचेस घेणे गरजेचे होते. परंतु निवड समितीने २०/२५ षटकांचे सामने घेऊन खेळाडूंचे मानसिक खच्चीकरण करीत प्रचंड मोठे नुकसान केले आहे. याशिवाय



निवड चाचणीतील २०/२५ षटकाचे सामने हे सर्व स्पर्धक खेळाडूंसाठी समान न घेता जाणीवपूर्वक काही खेळाडूंसाठी ४ सामने व काही खेळाडूंसाठी ३ सामने घेऊन निवड समितीने मर्जीतील खेळाडूंना झुकते माप दिले असून, काही खेळाडूंवर घोर अन्याय केला आहे. याशिवाय ज्या खेळाडूंची कामगिरी दोन दिवसीय टेस्ट क्रिकेट फॉरमॅटप्रमाणे उत्कृष्ट आहे अशा खेळाडूंची निवड न करता त्या खेळाडूंना डावलून निवड समितीने मनमानी कारभार करीत आपल्या पूर्वनिर्धारित वशिलेबाजीचा मार्ग अवलंबवीत मर्जीतील खेळाडूंची निवड केली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या खेळाडूंचा टेस्ट क्रिकेट फॉरमॅटप्रमाणे कामगिरी उत्तम आहे अशा खेळाडूंवर समितीने अन्याय केला आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मॅचेसचे वेळापत्रक जाहीर झालेले असताना देखील निवड समितीने अंतिम यादी जाहीर न करता केवळ एक व्हॉट्सअप ग्रुप बनवून त्यावर निवड झालेल्या खेळाडूंची नावे जाहीर केली आहे. आम्ही पालक अनेक वेळा सदरील यादी अधिकृत जाहीर करा, अशी विनंती निवड समितीला केली असता निवड समितीने सदरील यादी आम्ही जाहीर करू शकत नाही, तुम्हाला काय करायचे आहे ते करा, अशी उर्मट आणि उडवा-उडवीची उत्तरे निवड समितीचे अध्यक्ष रतन साडेगावकर हे देत असल्याचे म्हटले आहे.

सदरील निवड समिती तात्काळ बरखास्त करून अलीकडील ३ वर्षात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून राष्ट्रीय व राज्य पातळीवर क्रिकेट खेळत उत्तम कामगिरी केलेल्या खेळाडूंची निवड निवड समितीत करण्यात यावी. निवड समितीने मनमानी कारभार करीत निवड केलेली संशयास्पद व मर्जीतील खेळाडूंची व्हॉट्सअप ग्रुपवरील निवड यादी ही तात्काळ रद्द करण्यात यावी. नवीन निवड समितीच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन दोन दिवशी टेस्ट फॉरमॅटप्रमाणे दोन दिवशी मॅचेस घेऊन टेस्ट क्रिकेटच्या फॉरमॅटप्रमाणे उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड अंतिम यादीत करण्यात यावी. संशयास्पद व मर्जीतील खेळाडूंची निवड करणाऱ्या निवड समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्यावर बीसीसीआय व महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या नियमावलीप्रमाणे कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या प्रमुख मागण्यासाठी खेळाडू, पालक समन्वय समितीच्या वतीने श्री गुरुगोबिंदसिंगजी स्टेडियम समोर नांदेड येथे २८ रोजी खेळाडू व पालक समन्वय समितीच्यावतीने समितीचे अध्यक्ष प्रा. सदाशिव भुयारे यांच्या नेतृत्वात निदर्शने करण्यात आली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com